दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  + 91 97023 86118

•कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ •वर्ष-०१,अंक-२७३ •पृष्ठे-०४ •ठाणे, मंगळवार, १९ मार्च २०२४ •RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 •रु.२/-

## निवडणूक आयोगाने मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इकबाल सिंह चहल यांना पदावरून हटवले





■ **मुंबई, यश सावंत :**
मुंबई महापालिका आयुक्त इक्बालसिंग चहल यांची बदली रोखण्यासाठी महापालिका आयुक्तांना तीन वर्षांचा निकष लागू करू नये म्हणून राज्य सरकारने केलेली मागणी निवडणूक आयोगाने दुसऱ्यांदा फेटाळली. निवडणूक आयोगानेच चहल यांना पदावरून हटवले आहे. तशी घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ पदावर असलेल्या महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्तांच्या बदल्या करण्याचा आदेश निवडणूक आयोगाने फेब्रुवारी अखेरीस दिला होता. या आदेशामुळे चहल यांच्यासह काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या कराव्या लागणार होत्या. थेट निवडणूक प्रक्रियेत सहभागी नसल्याने आयुक्त व अतिरिक्त आयुक्तांना आदेशातून वगळावे, अशी विनंती करणारे पत्र राज्य सरकारने निवडणूक आयोगाला पाठविले होते. मात्र आयोगाने सरकारची ही विनंती फेटाळून लावली होती.

तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ पदावर असलेल्या महानगरपालिका आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्तांची बदली करावीच लागेल, असे स्पष्ट आदेश निवडणूक आयोगाने दिले होते. मात्र राज्य सरकारने त्यावर काहीही कारवाई न करता पुन्हा ही बदली रोखण्यासाठी पत्र लिहिले होते. ती मागणी फेटाळून राज्य सरकारने आता थेट चहल यांना पदावरून हटवले आहे. मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबलसिंह चहल यांच्यासह अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे व पी वेलारासू यांचीही बदली करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने फेब्रुवारी अखेर दिले होते. मात्र त्यावरही काहीही निर्णय राज्य सरकारने घेतला नाही. भिडे यांच्याकडे सागरी किनारा मागार्ची जबाबदारी आहे, तर वेलरासू यांच्याकडे रस्ते कॉंक्रिटीकरण, गोरेगाव मुलुंड जोडरस्ता, निःक्षारीकरण प्रकल्प असे सगळेच महत्वाचे प्रकल्प आहेत. मात्र आता या दोन अतिरिक्त आयुक्तांची बदली कधी होणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

इकबाल सिंह चहल यांनी मे २०२० मध्ये करोना काळात टाळेबंदी असताना मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला होता. त्यापूवीर्चे आयुक्त प्रवीण परदेशी यांची तत्कालीन राज्य सरकारने तडकाफडकी बदली केली होती. टाळेबंदीच्या काळात चहल यांनी रात्रीच पदभार स्वीकारला होता.

## जेष्ठ नागरिकांसाठी मुंबई लोकलमध्ये करण्यात आले मोठे बदल



■ **मुंबई, नितीन देवळेकर :**
मुंबई लोकलमधून गर्दीच्या वेळेत जेष्ठ नागरिकांना प्रवास करणे खूप कठिण होऊन जाते. मात्र, आता मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांचा लोकल प्रवास सुखाचा होणार आहे. जेष्ठ नागरिकांसाठी एक डबा राखीव ठेवण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे. जेष्ठ नागरिकांना रोजचा प्रवास करताना खूप अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळं त्यांची ही अडचण लक्षात घेऊन लोकलमधील मर्यादित आसनांच्या मुद्द्यावरुन मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने मध्य आणि पश्चिम रेल्वेला यावर तोडगा काढण्याची सूचना केली होती. त्यावेळी रेल्वेने मालडब्यांचे जेष्ठांसाठीच्या राखीव डब्यांत रुपांतर करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले होते. तसा प्रस्तावही मंजुरीसाठी पाठवण्यात आला होता. आता रेल्वेच्या या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळं लवकरच मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील लोकलमध्ये जेष्ठांसाठी राखीव डब्बा असणार आहे. एका लोकलमध्ये चार मालडब्बे असतात. गाडीच्या मध्यभागी असलेल्या मालडब्यात बदल करण्यात येणार असून त्याचे रुपांतर करून तो जेष्ठांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. या डब्यात १०४ प्रवाशांची क्षमता असून १३ आसने आणि ९१ उभे प्रवासी असे आसनक्षमता आहे. लवकरच हे बदल करण्यात येणार आहे. दरम्यान, लोकलच्या पहिल्या आणि शेवटच्या सेंकड क्लास डब्यात प्रत्येकी सात आसने जेष्ठ नागरिकांसाठी राखीव असतात. तर, १२ डब्यांच्या लोकलमध्ये ४ फर्स्ट क्लासचे डबे असतात. तर, तीन महिला प्रवाशांसाठी राखीव व दिव्यांग प्रवाशांसाठी दोन डबे आणि उर्वरीत डबे सर्वसामान्यांसाठी राखीव असतात. मालडब्यातील मालवाहकांचे प्रवासी भारमान अत्यंत कमी असल्याने एक मालडबा जेष्ठांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी मध्य व पश्चिम रेल्वेने सर्वेक्षण केले होते. त्यानंतर या बदलाला संबंधित विभागाने मंजुरी दिली आहे.

## मंत्रालयात वडापाव विकणाऱ्याने तिसऱ्या मजल्यावरून मारली उडी



■ **मुंबई, दिगंबर जाधव :**
एका व्यक्तीने मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने मंत्रालयात लावलेल्या संरक्षक जाळीमुळे संबंधित व्यक्तीचा जीव वाचला आहे. आज दुपारच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. घटनेची माहिती मिळताच मरीन ड्राईव्ह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन व्यक्तीला ताब्यत घेतलं आहे. अरविंद बंगेरा असं त्या व्यक्तीचं नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सदरील व्यक्ती बोरिवली येथील रहिवासी आहे. काही कामानिमित्त ते मंत्रालयात आले होते. मात्र अचानक या व्यक्तीने मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरून उडी मारल्याने एकच खळबळ उडाली. तिसऱ्या मजल्यावरून उडी मारल्यानंतर ही व्यक्ती पहिल्या मजल्यावरील संरक्षक जाळीवर पडल्याने तिचा जीव वाचला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान महिलेने आत्महत्या करण्याचा प्रयत्न का केला याचे नेमके कारण समजू शकले नाही. अरविंद बंगेरा असं त्या व्यक्तीचं नाव आहे. त्यांची वडापावची गाडी आहे. बंगेरा यांना मरीन ड्राईव्ह पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्यांची अधिक चौकशी सुरू आहे. मुंबई मंत्रालयात येऊन आत्महत्येचा प्रयत्न करण्याच्या संख्येत वाढ झाली होती. त्यामुळे मंत्रालयात सुरक्षा जाळी बसविण्यात आली आहे. या जाळीमुळे यापूवीर्ही अनेकांचे प्राण वाचले आहेत. मात्र, जाळीसोबत नागरिकांचेही प्रश्न सोडवण्यात आले तर त्याची गरज उरणार नाही, असं मत सर्वसामान्य व्यक्त करत आहेत.

## नाशिकमध्ये बनावट गुटखा कारखाना उद्ध्वस्त; सहा जणांना अटक



■ **नाशिक, सचिन कदम :**
शहरात ड्रग्स बनवणारी कंपनी मागील काळात उद्ध्वस्त करण्यात आली होती. कोटींचा कच्चामाल देखील पोलिसांनी यावेळी हस्तगत केला होता. नाशिक ड्रग्स प्रकरण राज्यभर गाजले असताना यातच आता नाशिकच्या नाशिक रोड परिसरातील गोसालवाडीत महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला आणि बनावट गुटखा बनवणाऱ्या कारखान्यावर नाशिक पोलिसांनी छापा टाकला आहे. यात सहा संशयित आरोपींना अटक केली असून त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी देखील न्यायालयाकडून सुनावण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संशयितांकडून तब्बल ९ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गोसावीवाडी येथील मंन्सुरी चाळीमध्ये एका घरात मागील चार महिन्यांपासून बनावट गुटखा तयार करण्याची फॅक्टरी सुरू होती, असे नाशिकरोड पोलिसांच्या तपास करत असताना उघड झाले आहे. काही महिन्यांपूर्वी नाशिकरोड भागात एमडी ड्रग्जनिर्मितीचा कारखाना व गोदामाचा पोलिसांनी पदार्फाश केला होता. गुटखा फॅक्टरी चालविणाऱ्या सहा जणांच्या टोळीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी न्यायालयाने सुनावली आहे. गोसावीवाडीला अगदी जवळ असलेल्या नाशिकरोड रेल्वेस्टेशन, बसस्थानक हा बनावट गुटखा विक्रीचा मूळ अड्डा होता. टोळीकडून चालत्या रेल्वेमध्येसुद्धा गुटख्याच्या पुड्यांची चोरी छुप्या पद्धतीने विक्री केली जात होती. रेल्वे गाड्यांमधून मोठ्या संख्येने परप्रांतीय प्रवाशांची ये-जा सुरू असते. त्याचाच फायदा घेत ही टोळी त्यांना बनावट गुटखा विक्री करून आरोग्य धोक्यात टाकत होती, असे पोलिसांनी सांगितले. रेल्वेमध्ये गुटखा विक्री करणारी दुसरी टोळी या भागात कार्यरत आहे का? याचाही तपास पोलीस करत आहे. गुन्हे शाखा युनिट दोनच्या उपायुक्त मोनिका राऊत यांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिक रोड परिसरात बनावट गुटखा बनवण्याचा कारखाना असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बनावट गुटखा बनवणाऱ्या कारखान्यावर धाड टाकत बनावट गुटखा बनवणाऱ्या टोळीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. न्यायालयाने संशयितांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## कळवा येथील एसटीची कार्यशाळा खिळखिळी; कर्मचाऱ्यांचा जीव टांगणीला




■ **ठाणे, रोहित जैसवाल :**
कळवा येथील एसटीची कार्यशाळा धोकादायक स्थितीत असून कर्मचाऱ्यांच्या डोक्यावर अपघाताची टांगती तलवार आहे तर दुसरीकडे ४०० लोकांचे काम १०० कर्मचारी करत असल्याने त्यांच्यावर कामाचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी स्लॅब कोसळून दोन कर्मचारी जखमी झाले होते. कळवा येथील राज्य परिवहन सेवेच्या कार्यशाळेतील दुरावस्थेबाबत तेथील कर्मचाऱ्यांनी केलेल्या तक्रारीनंतर त्यांनी कार्यशाळेची पाहणी केली. यावेळी इमारतीच्या दुर्दशेबाबत संताप व्यक्त करून कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत आणि आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली. त्यांनी केलेल्या पाहणीत कार्यशाळा इमारतीचे कॉलम पोखरल्याचे निदर्शनास आले असून त्यातील स्टीलही बाहेर आलेले आहे. भिंती आणि स्लॅब केव्हाही कोसळून मोठी जीवितहानी होऊ शकते, तसेच शौचालय, स्वच्छतागृहाची अतिशय दयनीय अवस्था असल्याचेही पाहणीत दिसून आले. येथे मनुष्यबळाची कमतरता असून ४०० कर्मचाऱ्यांची कामे फक्त १०० कर्मचारी करत आहेत. तसेच कमी मनुष्यबळ असताना त्यांच्यावर कमी वेळेत काम पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांकडून दबाव टाकला जातो. सुटे भाग आणि इतर साहित्यही पुरेसे नाहीत. एकूणच कर्मचारी तणावाखाली असून अपघाताच्या भीतीबरोबरच त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्यही ढासळू लागले आहे.

## मनपा ने बेस्ट कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटीसह दीड हजार कोटी थकविले



■ **मुंबई, विशाल कारंडे :**
आर्थिक तोटा कमी करणे आणि उत्पन्न वाढवण्यासाठी खटाटोप करणाऱ्या बेस्ट उपक्रमातील कार्यरत आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना गेल्या दोन वर्षांपासून ग्रॅच्युइटी, रजेचे रोखीकरण यांसह विविध देणी अद्यापही मिळलेली नाहीत. ही रक्कम दीड हजार कोटी रुपये असून यामध्ये निवृत्त कर्मचाऱ्यांची एकूण ४५७ कोटी रुपयांची ग्रॅच्युइटी थकित आहे. मुंबई महापालिकेकडून बेस्ट उपक्रमाला मिळणाऱ्या अनुदानानंतरच ही रक्कम अदा केली जाऊ शकते. मात्र अनुदानच कमी मिळत असल्याने ही देणी थकित आहेत. खर्च कमी करणे आणि उत्पन्न वाढविणे या उद्देशाने बेस्ट उपक्रमाने २०१९ पासून भाडेतत्त्वावरील बसगाड्या दाखल करण्यास सुरुवात केली. मात्र विविध प्रयोग करूनही बेस्टचे उत्पन्न ना वाढले ना तोटा कमी झाला. २०१९ मध्ये बेस्ट उपक्रम, मुंबई महापालिका आणि कामगार संघटनांमध्ये सामजंस्य करार झाला. बेस्टला आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी यामध्ये विविध उपाययोजना होत्या. यात तिकिट दर १० रुपयांवरून पाच रुपये करणे, आर्थिक संकटात सापडलेल्या बेस्टला मुंबई महापालिकेकडून दरमहा १०० कोटी रुपये देणे इत्यादी मुद्दे करारात नमूद होते. हा करार २०२१ मध्ये संपुष्टात आला. त्यानंतर नव्याने करार झालाच नाही. मात्र बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरमहा १५० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च होत असताना पालिकेकडून महिन्याला अनुदानापोटी केवळ ६० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम मिळू लागली. परिणामी, सध्या कार्यरत आणि निवृत्त कर्मचाऱ्यांची गेल्या दोन वर्षांत देणीच मिळाली नसल्याचे समोर आले आहे. या देण्यांमध्ये निवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटी रक्कम ही ४५७ कोटी २५ लाख रुपये आणि विविध प्रकारची अंतिम बिले ही ८४ कोटी ६१ लाख रुपयांची आहेत. कार्यरत आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या रजा सहाय्य भत्त्याची रक्कम २२ कोटी ४० लाख रुपये रक्कम आहे. रजा रोखीकरणाचे २८ कोटी रुपये आणि अन्य थकबाकी ८२९ कोटी ६६ लाख रुपये असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यासंदर्भात मुंबई महापालिका, बेस्ट उपक्रमाच्या बैठका होऊनही रक्कम प्राप्त झालेली नाही. त्यामुळे कार्यरत आणि निवृत्त कर्मचारी या रकमेपासून वंचित राहिले आहेत.

## ठाण्यात पहिल्यांदाच निवासी क्षेत्रात इस्कॉन मंदिर



■ **ठाणे, प्रतिनिधी :**
पिरामल रियल्टी आणि इस्कॉन यांच्या संयुक्त विद्यमाने पिरामल वैकुंठ, कोलशेत ठाणे येथे श्री राधा गोविंददेव मंदिराचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. यावेळी पिरामल एंटरप्राइजेस लि.चे चेअरमन अजय पिरामल आणि इस्कॉनचे गौरंग दास प्रभू उपस्थित होते. एखाद्या सोसायटीमध्ये उभारण्यात आलेले इस्कॉनचे हे महाराष्ट्रातील पहिले मंदिर आहे. एकूण ३२ एकर परिसरात हे मंदिर उभारले असून गुजरात आणि राजस्थानच्या भव्य मंदिरांपासून प्रेरणा घेऊन मंदिर बांधण्यात आले आहे. ९० फूट उंच कळस, १८ खांब यांसह मंदिराची निर्मिती 'शिल्पशास्त्र' आणि 'वास्तुशास्त्र' या तत्त्वांनी केली आहे. राजस्थानच्या भरतपूर येथील बन्सी पहारपुरा येथून मिळवलेल्या गुलाबी वाळूच्या दगडापासून अत्यंत बारकाईने मंदिराचे कोरीवकाम केले आहे. अयोध्येतील श्री रामजन्मभूमी मंदिराची आठवण करुन देणारे असे नागरा वास्तूशैलीचे स्वरूप आहे. मंदिरात ज्येष्ठ नागरिकांसाठी लिफ्टची सुविधाही करण्यात आली आहे. तसेच मंदिराचे नक्षीकाम पाहिल्यास रामायण तसेच कृष्णलीलेच्या गोष्टी अभ्यासायला मिळतील. १९७०च्या दशकापासून पिरामल कुटुंब इस्कॉनशी निष्ठेने जोडले गेले आहे. माझी आई श्रीमती ललिता पिरामल यांच्यामुळे आध्यात्मिक संबंध अधिक घट्ट झाला. पिरामल रियल्टी आणि इस्कॉन यांचे एकत्र येणे हे अध्यात्म आणि आधुनिक जीवनमानाच्या सुसंवादी अभिसरणाचे प्रतीक आहे, 'सेवाभाव'च्या नीतिमत्तेचे उदाहरण देते, तसेच पिरामल समूहाची वचनबद्धताही प्रतिबिंबित करते. हे मंदिर केवळ पिरामल वैकुंठच्या रहिवाशांसाठीच नाही तर इतर सर्व भाविकांनाही दर्शनासाठी खुले आहे.

## दहशतवाद्यांनी वास्तव्य केलेल्या इमारतीवर एनआयए कडून जप्तीची कारवाई




■ **पुणे, अभिजित येरुल्लू :**
देशात बॉम्बस्फोट घडविण्याच्या तयारीत असलेल्या दहशतवाद्यांनी वास्तव्य केलेली कोंढव्यातील इमारत राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) जप्त केली. दरम्यान, या दहशतवाद्यांनी मुंबई-पुण्यासह गुजरातमधील महत्वाच्या शहरांमध्ये बॉम्बस्फोट घडविण्याच्या तयारी केली होती, असेही तपासात समोर आले होते. तर, कोंढव्यात त्यांनी बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले होते. एनआयएने मोहम्मद शहानाझ आलम, रिजवान अली, अब्दुलाह शेख, तलाह लियाकत खान, मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान उर्फ मटका उर्फ अमीर अब्दुल हमिद खान (रा. रतलाम, मध्य प्रदेश), मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी उर्फ अदिल उर्फ अदिल सलीम खान (रा. रतलाम, मध्य प्रदेश), कादीर दस्तगिर पठाण उर्फ अब्दुल कादीर, समीब नासीरउद्दीन काझी (दोघे रा. कोंढवा, पुणे), जुल्फीकार अली बडोदवाला उर्फ लालाभाई उर्फ लाला उर्फ सईफ, शमिल साकिब नाचन व आकिफ अतिक नाचन (तिघेही रा. पडघा, ठाणे) यांना अटक केली आहे. पुणे पोलिसांनी कोथरूड परिसरात मध्यरात्री गस्त घालत असताना दुचाकी चोरीच्या प्रयत्नात असताना तिघांना पकडले होते. एकजन पळून गेला होता. दोघांच्या चौकशीत हे वॉन्टेड दहशतवादी असल्याचे समोर आले होते. यादरम्यान, मोहम्मद याला कोंढव्यात नेले असता तो पसार झाला होता. यानंतर २ नोव्हेंबर २०२३ रोजी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने त्याला पकडले होते. त्याला तपासासाठी एनआयएने ताब्यात घेतल्यानंतर या दहशतवाद्यांनी सातारा जिल्ह्यातील एका सराफी दुकानात दरोडा टाकून रोकड लुटली होती. तसेच, त्यांनी बॉम्बस्फोटाचे साहित्य खरेदी केले होते. कोंढव्यात त्यांनी बॉम्ब कसा तयार करायचा याबाबतचे प्रशिक्षण घेतले होते. कोल्हापूर, सातारा परिसरातील जंगलात त्यांनी नियंत्रित पद्धतीने बॉम्बस्फोट केले होते.

## सहा वर्षापूर्वी झालेल्या खुनाचा उलगडा करण्यास स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला मिळालं यश



■ **नवीमुंबई, भावना जैन :**
खालापूर तालुक्यातील रसायनी पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या जयेश काशिनाथ खुडे या २७ वर्षीय तरुणाच्या खुनाचा छडा सहा वर्षांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने लावला आहे. जयेश यांची हत्या करणाऱ्या मुख्य आरोपी ओमकार सुनील शिंदे (२५) रां. वावंढळ, खालापूर आणि त्याचा साथीदार रोहित पाटील (२७) रा चांभार्ली या दोघांना अटक करण्यात आलेली आहे. सहा वषार्पूर्वी झालेल्या गुन्ह्याचा तपास लावण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला यश आले आहे. अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी १८ मार्च रोजी अधीक्षक कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे चे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, सपोनी संदीप पोमण उपस्थित होते. रायगड जिल्ह्यात घडलेल्या काही खुनाच्या गुन्ह्याचा तपास अद्यापही लागलेला नाही. अशा गुन्ह्याचा तपास करण्यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे विभागाचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी एक पथक नेमले आहे. या पथकांच्या मार्फत उघड न झालेल्या खुनाचे गुन्ह्याचा तपास केला जात आहे. सपोनी संदीप पोमण यांच्या पथकाने रसायनी येथे सहा वषार्पूर्वी घडलेल्या गुन्ह्याचा कोणताही पुरावा नसताना उघडकीस आणला आहे. अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली आहे. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत चावणे गाव ते पेट्रो नॉस रस्त्यावर १३ एप्रिल २०१८ साली रात्री साडे नऊच्या सुमारास अज्ञातांनी जयेश यांच्या अंगावर धारदार शस्त्राने अनेक वार करून मृतदेह नाळ्यामध्ये फेकून दिला होता.

## Cvigil ॲपवर आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करता येणार, १०० मिनिटांत होणार कारवाई




■ **मुंबई प्रतिनिधी :**
२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आदर्श आचारसंहितेचे पालन व्हावे यासाठी निवडणूक आयोगाने Cvigil ॲप अपडेट केलं आहे. या ॲपच्या मदतीने आचारसंहिता भंगाची तक्रार काही मिनिटांत करता येते आणि त्यावर केलेल्या कारवाईची माहिती १०० मिनिटांत तुमच्यापर्यंत पोहोचते. लोकसभा निवडणुकीच्या काळात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचे दिसल्यास, तुम्ही तुमच्या मोबाईलवरून त्याबाबत सहज तक्रारदेखील करू शकता.आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, तुम्हाला तुमच्या Android फोनमध्ये Cvigil ॲप डाऊनलोड करावं लागेल. त्यानंतर तुम्ही आचारसंहिता उल्लंघनाबाबत फोटो किंवा व्हिडीओद्वारे ऑनलाईन तक्रार करू शकता. या ॲपची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तक्रारदाराची ओळख गुप्त ठेवली जाते आणि आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाते. तुम्हालाही Cvigil ॲप कसं वापरायचं हे जाणून घ्यायचं असेल, तर या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात. आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी Cvigil ॲप तयार करण्यात आलं आहे. आत्तापर्यंत आचारसंहिते संदभार्तील तक्रारीवर योग्य पुराव्याअभावी कोणतीही कारवाई करता येत नव्हती. पण, Cvigil ॲपच्या मदतीने आता कोणतीही व्यक्ती आचारसंहिता भंगाची तक्रार काही मिनिटांत पुराव्यासह करू शकणार आहे. तसेच या ॲपद्वारे तक्रार केल्यास १०० मिनिटांत त्यावर कारवाई केली जाईल. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार अँड्रॉईड मोबाईलवर Cvigil ॲप वापरता येणार आहे. पोटनिवडणूक, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत आचारसंहिता भंगाची तक्रार करण्यासाठी हे ॲप तयार करण्यात आलं आहे.

## एसटीमधून प्रवास करताना सावधान, वृद्धांना लुटणाऱ्या महिला चोरट्यांचा सुळसुळाट



■ **ठाणे, प्रतिनिधी :**
तुम्ही बसगाड्यांमधून प्रवास करत असाल तर सावधान काही महिला लहान मुलाला हातात घेऊन चोऱ्या करत असल्याचा प्रकार समोर आला आहे. पालघरमध्ये राहणाऱ्या एका महिलेचे साडेपाच तोळे सोने या महिला चोरट्यांनी चोरी केले आहे. याप्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्य सरकारने महिलांना आणि वृद्धांना राज्य परिवहन सेवेच्या बसगाड्यांमधून (एसटी) प्रवास करताना सवलत दिली आहे. त्यामुळेएसटी गाड्यांमधून प्रवास करणाऱ्या महिलांचे आणि वृद्धांचे प्रमाण वाढले आहे. पालघर येथील विक्रमगडमध्ये ६९ वर्षांची महिला राहते. काही दिवसांपूर्वी त्या ठाण्यात त्यांच्या नातेवाईकांकडे येण्यासाठी एसटी बसगाडीतून प्रवास करत होत्या. त्यांनी त्यांच्या पर्समध्ये साडेपाच तोळ्यांचे सोन्याचे दागिने ठेवले होते. एसटी भिवंडी येथे आली असता त्यामध्ये तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे बसगाडीमधील वाहकाने वृद्धेला ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या दुसऱ्या एसटीमध्ये बसवून दिले. बसगाडी काही अंतरावर गेली असता, तीन महिला त्या बसगाडीमध्ये चढल्या. त्यांच्यासोबत लहान मूल होते. एक महिला वृद्धेच्या शेजारी बसली. दुसरी महिला बसगाडीच्या जिन्यांवर बसली. तर तिसरी महिला वृद्धेच्या मागे उभी राहिली. उभ्या असलेल्या महिलेने वृद्धेकडे पाण्याने भरलेली बाटली दिली. त्या बाटलीतील पाणी दुसऱ्या बाटलीत ओतण्यास सांगितले. थोड्यावेळेत जिन्यांवर बसलेल्या महिलेने वृद्धेला एक पिशवी दिली. त्या पिशवीमधून बिस्किट काढून देण्यास सांगितले.

## मासिक पाळी पुढे ढकलताय?

**सण**, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.

■ मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे या संदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.

■ या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.

■ या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.

■ या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणे, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



## मेकअप उतरवण्यासाठी चेहऱ्यावर महागडे प्रॉडक्ट्स लावण्यापेक्षा घरच्या घरी बनवा 'हे' पॅक

सध्याच्या काळात वेगवेगळी सौंदर्यप्रसाधने वापरून मेकअप करणे हा अनेक तरुणींचा, महिलांचा आवडीचा विषय बनलाय. कुठेही बाहेर जाताना, समारंभास जाताना छान नटून-थटून जाणे महिला अधिक पसंत करतात. म्हणून आपले सौंदर्य आणखी खुलवण्यासाठी त्या आपल्या चेहऱ्यावर छान मेकअप करतात. मात्र ही उत्पादने जितकी महाग तितका तो मेकअप उतरवण्यासाठी लागणारी उत्पादनेही तितकीच महाग असतात. कारण ॲडव्हान्स मेकअप उतरवण्यासाठी तितकेच कष्ट घ्यावे लागतात, अन्यथा तुमच्या चेहऱ्यावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो.



**मात्र** दरवेळेला मेकअप उतरवण्यासाठी इतकी महागडी प्रॉडक्ट घेणे सर्वांनाच परवडेल असे नाही. अशा वेळी तुम्ही घरच्या घरी घरगुती गोष्टींनी हा मेकअप काढू शकता ज्या तुम्हाला त्वरित उपलब्ध होतील.

**नारळाचे तेल**

नारळाच्या तेलात अनेक पोषक घटक असतात. याचा उपयोग तुम्ही मेकअप काढण्यासाठी करू शकता. तसेच त्याचा तुमच्या शरीरावर काही परिणाम होणार नाही.

**मध आणि कोरफड**

मध आणि कोरफड याच्या मिश्रणाचा वापर करून तुम्ही मेकअप उतरवू शकता. त्यासाठी एका वाटीत कोरफड आणि मध एकत्र करा. त्यात दोन चमचे तूप घाला. नंतर हे मिश्रण त्वचेला लावून छान मसाज करा आणि काही वेळाने कोमट पाण्याने तुमचा चेहरा धुवून टाका.

**दूध आणि दही**

दूध आणि दह्याचा वापर करूनही तुम्ही मेकअप उतरवू शकता.

**बदामाचे तेल**

बदामाचे तेल वापरून तुम्ही चेहऱ्यावरील मेकअपसोबत चेहऱ्यावर चिकटलेली धूळ ही साफ करू शकता. तसेच हे तेल त्वचेच्या स्काल्प वरील धुळीसोबत अतिरिक्त स्कीनही

## ॲल्युमिनियम फॉईलमध्ये पदार्थ का शिजवू नये?



**जर** तुम्ही दररोज जेवणासाठी ॲल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की, ॲल्युमिनियम फॉईलमध्ये शिजवलेले अथवा गुंडाळलेले पदार्थ खाल्ल्याने शरीरावर परिणाम होतो. जेव्हा ॲल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न शिजवले जाते. त्यावेळी मोठ्या प्रमाणात ॲल्युमिनियम अन्नात मिसळते आणि हे अन्न खाल्ल्याने त्यावाटे शरीरात जाते. यामुळे हाडांचे आजार तसेच ब्रेन सेल्सची वाढ कमी

## ॲपल सायडर व्हिनेगर - नखांचा पिवळेपणा कमी करण्याचा घरगुती उपाय

**नखांचा पिवळेपणा हटवण्यासाठी तुम्ही डार्क रंगाच्या नेलपेंट्स लावता का? यामुळे तुम्ही जितके समस्येपासून दूर पळण्याचा प्रयत्न करताय ती अधिकच गंभीर होते.**



**सतत** आणि डार्क रंगांची नेलपेंट लावणं हेच नखांच्या नुकसानाचं एक कारण आहे. मग हा नखांचा पिवळेपणा हटवण्यासाठी काही महागड्या ट्रीटमेंट्स घेण्याऐवजी 'ॲपल सायडर व्हिनेगर' हा घरगुती उपाय नक्की करून पहा. नियमित १०-१५ दिवस हा प्रयोग केल्याने तुम्हाला निश्चितच फायदा होईल.

**कसे आहे 'ॲपल सायडर व्हिनेगर' उपयुक्त?**

'ॲपल सायडर व्हिनेगर' दातांप्रमाणेच नखांचाही पिवळेपणादेखील कमी करतो. ॲपल सायडर व्हिनेगरमध्ये ॲसेटिक आणि मॅलिक ॲसिड असल्याने नखांचा पिवळेपणा कमी होतो. तसेच त्यातील ॲण्टीफंगल गुणधर्मामुळे संसर्ग दूर राहण्यासदेखील मदत होते. काही जणांच्या नखांवर पांढरे ठिपके पडलेले दिसतात. हे शरीरात कॅल्शियमची कमतरता आणि पचनक्रियेत बिघाड असल्याचे लक्षण आहे. 'ॲपल सायडर व्हिनेगर' प्यायल्यास

**कसे वापराल हे मिश्रण?**

- नखांवरील नेलपेंट काढा.
- कपभर कोमट पाण्यात एक कप ॲपल सायडर व्हिनेगर मिसळा.
- या मिश्रणामध्ये २०-२५ मिनिटे बोटं बुडवून ठेवा आणि काही वेळाने थंड पाण्याने हात स्वच्छ धुवा.
- नखं कोरडी करून त्यावर ऑलिव्ह ऑईलने मसाज करा.
- हा प्रयोग नियमित दिवसांतून दोनदा



## जाणून घ्या 'ड्रॅगन फ्रूट'चे फायदे

ड्रॅगन फ्रूटला सुपरफ्रूट देखील म्हटले जाते. कारण याचे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत. मधुमेह आणि हृदयाच्या समस्येसाठी देखील हे फळ फायदेशीर ठरते. या फळाच्या फायद्याविषयी जाणून घेऊया...

**वजन कमी करण्यास मदत**

ड्रॅगन फ्रूट हे पोषक तत्त्वांनी भरलेले असते व त्यांच्यात कॅलरी देखील कमी असते. यातील उच्च फायबर निरोगी, वजन कायम ठेवण्यात व आरोग्याच्या समस्या कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

**आजारांशी लढण्यास मदत**

ड्रॅगन फ्रूटमध्ये अँटी ऑक्सिडेंट्सचे प्रमाण अधिक असते. जसे की विटामिन सी आणि कॅरोटेनॉइडसारखे आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात.

**आतड्यांसाठी चांगले**

या फळात प्रीबायोटिक्सचे प्रमाण अधिक आहे व चांगल्या बॅक्टेरियाचे प्रमाण वाढवण्यास याची मदत होते. पचनतंत्रात देखील यामुळे सुधारणा होते.



**रोग प्रतिकारशक्ती सुधारण्यास मदत**

फळातील विटामिन सी आणि कॅरोटीनॉयड रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते व पांढऱ्या रक्त पेशींचे संरक्षण करते.

**अशक्तपणा असणाऱ्यांसाठी फायदेशीर**

ड्रॅगन फ्रूटमध्ये लोहाचे प्रमाण अधिक आहे. या फळामुळे व्यक्तीच्या शरीरातील

## स्लिम दिसण्यासाठी हलके-फुलके फंडे

फिट राहण्यासाठी जिमला जाणं, व्यायाम करणं ही चांगली कृती असते, पण एका रात्रीत कोणी स्लिम होत नाही. मग काही महत्त्वाच्या दिवशी आपल्याला बारीक दिसायचं असतं. आपल्या राहणीमानाकडे थोडं लक्ष दिलं तर आपला लूक थोडा स्लिम करू शकता.



**खूप टाइट कपड्यांपासून दूर राहा**

टाइट आणि स्कीन फिट कपडे वापरू नका. याचा अर्थ असा नाही की, आपण ओव्हरसाइज कपडे वापरावेत. थोडे ढिले कपडे घालावेत, ज्यामुळे पोट बाहेर दिसणार नाही आणि खूप हेवी पर्सनॅलिटी वाटणार नाही.

**कमी झोप टाळा**

संशोधनानुसार जे लोक ८ तासांहून कमी वेळ झोपतात त्यांच्यात स्थूलपणा वाढण्याची शक्यता जास्त असते. कमी झोपेचा परिणाम भुकेवर नियंत्रण ठेवणाऱ्या हार्मोन्स घ्रेलिन आणि लॅप्टिनवर होतो. कमी झोप झाल्यास ते असंतुलित होतात. जर आपण आपलं वजन नियंत्रणात ठेवू इच्छिता, तर रात्रीची झोप पूर्ण आणि शांत झोप घ्या.

**ब्राइट कलर्सपासून दूर राहा**

तुम्हाला जर ब्राइट कलर्स आवडत असतील तर त्यापासून जरा दूर राहणं सुरू करा. थोडे सोबर आणि डल कलर्समध्ये आपण अपेक्षेपेक्षा कमी लठ्ठ वाटाल. प्लेन कपड्यांऐवजी लाइन्स किंवा चेक्स प्रिंटचा वापर करा.

**लो वेस्ट जीन्स घालू नका**

फॅशनच्या जगात आपणही आंधळे होऊन लो वेस्ट जीन्स सारखे प्रयोग करतो. पण त्यापासून दूर राहा. लो वेस्ट जीन्स घातल्यानं कमरेखालचा भाग अधिकच हेवी दिसेल. अधिक फॅशनेबल दिसण्यापेक्षा साधेपणावर भर द्या, त्याने आपण बारीक दिसाल.

**पॉकेटवर लक्ष द्या**

अनेकांना सवय असते पॅण्टच्या खिशात खूप काही वस्तू भरून ठेवतात. जर आपण लठ्ठ असाल तर ही सवय बदला. पॅण्टच्या खिशात अधिक सामान

# हारे का सहारा खाटू श्याम हमारा

आज खाटू श्यामजी म्हणून ओळखले जाणारे देवता खरेतर पांडवांमधील भीम यांचे नातू घटोत्कच यांचे पुत्र आहे. ज्याचे खरे नाव बर्बरीक आहे. त्यांच्यात लहानपणापासूनच शूर योद्ध्याचे गुण होते. बर्बरीक यांनी महाभारत युद्धात भाग घेण्यासाठी आईकडे परवानगी मागितली. तेव्हा त्यांच्या आईला समजले की कौरवांचे सैन्य मोठ्या संख्येने असल्यामुळे पांडवांना युद्धात अडचणी येऊ शकतात. यावर बर्बरीक यांच्या आईने त्यांना परवानगी दिली आणि युद्धात हरत असलेल्या बाजूस पाठिंबा देण्याचे वचन घेतले. तेव्हापासून खाटू श्याम यांना हारे का सहारा असे म्हटले जाऊ लागले. तीन बाण धारी - बर्बरिक यांच्यावर प्रसन्न होऊन भगवान शिवाने त्यांना तीन अभेद्य बाण दिले, म्हणून त्याला तीन बाण धारी असेही म्हणतात. या तीन बाणांमध्ये इतकी ताकद होती की या तीन बाणांनीच महाभारत युद्ध संपवता आले असते. शीशचा दानी - त्यांच्या आईच्या सल्ल्यानुसार, युद्धात पराभूत झालेल्या बाजूच्या समर्थनासाठी बर्बरिक आले. परंतु भगवान श्रीकृष्णांना माहित होते की कौरवांचा पराभव पाहून बर्बरिक कौरवांना साथ देतील, त्यामुळे पांडवांचा पराभव निश्चित होता. तेव्हा भगवान श्रीकृष्णाने ब्राह्मणाचे रूप धारण केले आणि बर्बरिककडून दान म्हणून मस्तक मागितले. यावर बर्बरिकने तलवारीने आपले मस्तक देवाच्या चरणी अर्पण केले. म्हणूनच त्यांना शीश दानी म्हणतात. राजस्थानच्या शेखावाटी राज्यातील सीकर जिल्ह्यात परमधाम खाटू स्थित आहे. खाटू श्यामजी इथे बसले आहेत. खाटूचे श्याम मंदिर अतिशय प्राचीन आहे. दरवर्षी फाल्गुन महिन्यात शुक्ल षष्ठीपासून बारसपर्यंत ही जत्रा भरते. श्यामबाबांचा महिमा सांगणारे भक्त केवळ राजस्थान किंवा भारतातच नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यात आहेत. चला जाणून घेऊया कोण आहेत बाबा खाटू श्यामजी? त्याची कथा काय आहे? खाटू श्यामजी कोण आहेतः खाटू श्यामजी हे भगवान कृष्णाचे कलियुग अवतार आहेत. महाभारतात भीमाचा मुलगा घटोत्कच आणि घटोत्कचाचा मुलगा बर्बरिक होता. बर्बरिक यांना बाबा खाटू श्याम म्हणतात. त्याच्या आजीचे नाव हिडिंबा आहे. खाटू श्यामची कथाः बर्बरिक हा जगातील सर्वोत्तम धनुर्धर होता. बर्बरिकाला तीन बाण पुरेसे होते, ज्याच्या जोरावर तो कौरव आणि पांडवांच्या संपूर्ण सैन्याचा नाश करू शकला. रणांगणावर भीमाचा नातू बर्बरिक याने दोन्ही छावणीच्या मध्यभागी एका पिंपळाच्या झाडाखाली उभे राहून घोषणा केली की ज्या बाजूने पराभव होईल त्या बाजूने मी लढेन. बर्बरिकच्या या घोषणेने कृष्णाला काळजी वाटली. अर्जुन आणि भगवान श्रीकृष्ण जेव्हा भीमाचा नातू बर्बरिक यांच्या शौर्याचा चमत्कार पाहण्यासाठी त्यांच्यासमोर प्रकट झाले, तेव्हा बर्बरिकाने त्यांच्या शौर्याचा एक छोटासा नमुना दाखवला. कृष्णाने सांगितले की जर तुम्ही या झाडाची सर्व पाने एकाच बाणाने टोचली तर मला ते मान्य होईल. बर्बरिकाने आज्ञा घेतली आणि झाडाच्या दिशेने बाण सोडला. बाण एकामागून एक सर्व पानांना छेदून जात होता, त्याच वेळी एक पान पडून खाली पडले. कृष्णाने त्या पानावर पाय ठेवून लपवून ठेवला, तो टोचला जाऊ नये या विचाराने, पण सर्व पाने टोचणारा बाण कृष्णाच्या पायाजवळ येऊन थांबला. तेव्हा बर्बरिक म्हणाले की, प्रभु, तुमच्या पायाखाली एक पान दडले आहे, कृपया तुमचे पाय काढून टाका, कारण मी बाणांना फक्त पाने टोचण्याचा आदेश दिला आहे, तुमचे पाय टोचण्याची नाही. त्यांचा हा चमत्कार पाहून कृष्ण चिंतातूर झाले. भगवान कृष्णाला माहित होते की बर्बरिका वचनानुसार हरलेल्याला साथ देईल. जर कौरव हरताना दिसले तर पांडवांना त्रास होईल आणि पांडव बर्बरीकसमोर हरताना दिसले तर तो पांडवांना साथ देईल. अशाप्रकारे तो एका बाणाने दोन्ही बाजूंच्या सैन्याचा शेवट करेल. मग भगवान श्रीकृष्ण ब्राह्मणाच्या वेशात सकाळी बर्बरिकाच्या छावणीच्या दारात पोहोचले आणि दान मागू लागले. बर्बरिक



म्हणाला- ब्राह्मण सांगा! तुम्हाला काय हवे आहे? ब्रह्मस्वरूप कृष्णाने सांगितले की तू देऊ शकणार नाहीस. पण बर्बरिक कृष्णाच्या जाळ्यात अडकला आणि कृष्णाने त्याचे शीर मागितले. बर्बरिकने आजोबा पांडवांच्या विजयासाठी स्वेच्छेने आपले मस्तक दान केले. बर्बरिकाचा बलिदान पाहून दान केल्यानंतर श्रीकृष्णाने कलियुगात बर्बरिकला स्वतःच्या नावाने पूजेचे वरदान दिले. आज बर्बरिकाची खाटू श्याम म्हणून पूजा केली जाते. कृष्णाने जेथे त्यांचे शीश ठेवले त्या जागेचे नाव खाटू आहे.

अज्ञात रहस्येः

1. खाटू श्याम म्हणजे मां सैव्यम पराजितः। म्हणजेच पराभूत आणि निराशांना बळ देणारा.
2. खाटू श्याम बाबा हे जगातील सर्वोत्कृष्ट धनुर्धर आहेत, फक्त श्री राम हे त्यांच्यापेक्षा मोठे मानले जातात.
3. खाटू श्यामजींची जयंती दरवर्षी कार्तिक शुक्ल पक्षातील देवूतानी एकादशीला मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते.
4. खाटूचे श्याम मंदिर खूप प्राचीन आहे, परंतु सध्याच्या मंदिराची पायाभरणी सन 1720 मध्ये झाली. इतिहासकार पंडित झाबरमल्ला शर्मा यांच्या मते, औरंगजेबाच्या सैन्याने 1679 मध्ये हे मंदिर उद्ध्वस्त केले होते. त्यावेळी मंदिराच्या रक्षणासाठी अनेक राजपूतांनी बलिदान दिले होते.
5. खाटू श्याम मंदिर परिसरात बाबा खाटू श्यामची प्रसिद्ध जत्रा भरते. ही जत्रा हिंदू महिन्याच्या फाल्गुन महिन्याच्या शुक्ल षष्ठीपासून बारसपर्यंत चालते. ग्यारसचा दिवस हा जत्रेचा खास दिवस असतो.
6. बर्बरिक हा देवीचा उपासक होता. देवीच्या वरदानाने त्यांना तीन दिव्य बाण मिळाले होते, जे त्यांच्या लक्ष्याला छेदून त्यांच्याकडे परत येतील. यामुळे बर्बरिक अजिंक्य होता.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 8 | | 5 | | | | 6 | |
| 3 | | | 4 | | 7 | 2 | 8 | |
| | 6 | 9 | | 1 | | | 4 | |
| | 3 | | | 5 | | | | |
| 9 | 7 | 4 | | | | 5 | | 8 |
| | | | | | 4 | | 7 | |
| | | 8 | | 3 | | | 2 | |
| 2 | 4 | | | | 9 | | | |
| | 1 | | 2 | | | 9 | | |

## उत्तर सुडोकू -३४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 5 | 8 | 4 | 6 | 9 | 2 | 7 | 1 |
| 7 | 2 | 4 | 1 | 3 | 5 | 8 | 9 | 6 |
| 1 | 6 | 9 | 2 | 7 | 8 | 5 | 3 | 4 |
| 9 | 3 | 5 | 6 | 4 | 1 | 7 | 8 | 2 |
| 8 | 1 | 6 | 7 | 9 | 2 | 4 | 5 | 3 |
| 2 | 4 | 7 | 5 | 8 | 3 | 1 | 6 | 9 |
| 4 | 7 | 2 | 9 | 5 | 6 | 3 | 1 | 8 |
| 5 | 9 | 3 | 8 | 1 | 4 | 6 | 2 | 7 |
| 6 | 8 | 1 | 3 | 2 | 7 | 9 | 4 | 5 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

### १९ मार्च

- १६७४: शिवाजी महाराजांच्या सर्वात धाकट्या पत्नी काशीबाई यांचे निधन.
- १८४८: लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्या शतपत्रांपैकी पहिले पत्र मुंबईच्या प्रभाकर या वृत्तपत्रात प्रसिध्द झाले.
- १९३१: अमेरिकेतील नेवाडा राज्यात जुगाराला कायदेशीर मान्यता मिळाली.
- १९३२: सिडनी हार्बर ब्रिज सुरू झाला.
- २००१: वेस्ट इंडीजचा वेगवान गोलंदाज कोर्टनी वॉल्शने दक्षिण अफ्रिकेच्या जॅक्स कॅलिसला पायचीत करुन कसोटी सामन्यातील पाचशेवा बळी मिळविला. कसोटी सामन्यांत ५०० बळी मिळवणारा तो पहिला गोलंदाज बनला.
- २००३: अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी इराकविरुद्ध युद्ध पुकारले. १९ मार्च जन्म
- १८२१: ब्रिटिश लेखक, कवी, संशोधक, मुत्सद्दी आणि गुप्तहेर सर रिचर्ड बर्टन यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑक्टोबर १८९०)
- १८९७: चित्रपट संगीतकार शंकर विष्णू तथा दादा चांदेकर यांचा जन्म.
- १९००: मूलद्रव्याच्या समस्थानिकांच्या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक जीन फ्रेडरिक जोलिओट यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑगस्ट १९५८)
- १९३६: स्विस अभिनेत्री ऊर्सुला अँड्रेस यांचा जन्म.
- १९३८: बालनाट्य लेखिका आणि नामवंत चित्रपट दिग्दर्शिका सई परांजपे यांचा जन्म.
- १९८२: फेसबुक चे सहसंस्थापक एडुवार्डो सावेरीन यांचा जन्म. १९ मार्च मृत्यू
- १८८४: आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य केरुनाना लक्ष्मण छत्रे यांचे निधन. (जन्म: १६ मे १८२५)
- १९७८: भारतीय वकील आणि राजकारणी एम. ए. अय्यंगार यांचे निधन. (जन्म: ४ फेब्रुवारी १८९१)
- १८८२: स्वातंत्र्यसेनानी, गांधीवादी, समाजवादी आणि पर्यावरणवादी जीवटराम भगवानदास तथा आचार्य कपलानी यांचे निधन. (जन्म: ११ नोव्हेंबर १८८८)

## भविष्य

**मेष** — वागण्या-बोलण्यात काहीसा हटवादीपणा येईल. कामात गतीमानता येईल. स्वतःबद्दलच्या नसत्या कल्पना बाजूला साराव्यात.

**वृषभ** — वागण्यात कर्मठपणा आणाल. वडीलांचा मान ठेवून निर्णय घ्यावा. प्रगल्भतेने वागणे ठेवाल. न्यायी वृत्तीने मत मांडाल.

**मिथुन** — प्रतिकूलतेतून मार्ग काढावा. आरोग्याची काळजी घ्यावी. अति विचार करू नका. अचानक धनलाभ संभवतो. मनातील आकांक्षा पूर्ण होईल.

**कर्क** — शांत व संयमी विचार कराल. वैचारिक आधुनिकता ठेवावी. जोडीदाराचे मत विचारात घ्यावे. भावंडांना मदत कराल. घराची सजावट कराल.

**सिंह** — चुकीच्या लोकांमुळे मनःस्ताप होण्याची शक्यता आहे. परिस्थिती जाणून योग्य मार्ग काढावा. सर्दी, खोकला यांसारखे त्रास संभवतात. वाताचे विकार बळावू शकतात.

**कन्या** — मनातील नसते संशय काढून टाकावेत. अत्यंत व्यवहारी दृष्टीकोन ठेवाल. आपल्या बुद्धिमत्तेचा सदुपयोग करावा. दीर्घकाळ चिकाटीने कामे कराल. जोडीदाराची प्राप्ती वाढेल.

**तुला** — घरगुती कामात अधिक कष्ट पडू शकतात. आपल्या गृहसौख्याकडे अधिक लक्ष द्यावे. हातातील कामात यश येईल. नातेवाईकांना मदत करावी लागेल. प्रवासात वाहन जपून चालवावे.

**वृश्चिक** — काही गोष्टींचा अधिक खोलवर विचार करावा. धैयार्ने कामे हाती घ्याल. व्यवसायात चांगली आर्थिक कमाई होईल. हातात काही नवीन अधिकार येतील. कौटुंबिक खर्चाचा ताण

**धनु** — काही बदल जाणीवपूर्वक करावेत. नसत्या वादात अडकू नका. निराशेच्या आहारी जाऊ नये. घराची कामे सुरळीत पार पडतील. स्वबळावर कामे उरकाल.

**मकर** — जुन्या गोष्टींचा आधार घेणे टाळावे. सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. कामातील अडथळे प्रयत्नाने दूर करावे लागतील. छुप्या शत्रूंची डोकेदुखी वाढेल. हातातील अधिकार वापरावेत.

**कुंभ** — उगाचच कोणाशीही वैर पत्करू नका. काही कारणाने घरापासून दिवसभर दूर राहावे लागेल. गप्पांची मैफल जमवाल. तुमच्या बोलण्याचा चांगला प्रभाव पडेल. कौटुंबिक खर्च आटोक्यात ठेवावा.

**मीन** — कामाचा योग्य आढावा घ्यावा. मानसिक ताण जाणवेल. कामातील दिरंगाई टाळण्याचा प्रयत्न करावा. मानापमान फार मनावर घेऊ नका. आपले स्वत्व गुण राखून वागाल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# 'रोखुनी' मज पाहू नका..

वजनात मारून, मापात कापून कबुतरांना खायला घालण्याचा पुण्यकर्मी सत्संग करणारे या देशात नेहमीच होते. पण ते वैयक्तिक पातळीवर. परंतु आर्थिक तोटा होत असतानाही आपल्या एकूण आर्थिक उलाढालीच्या कित्येक पट देणग्या राजकीय पक्षांना देणारे उद्योगपती महाभाग हे देशाने आताच पाहिले. त्यावरून या देशाचे वर्णन देणग्यांच्या देशा असेही करता येईल. या देणग्यांच्या विश्वरूप दर्शनाबद्दल खऱ्या पारदर्शी व्यवस्थेची आस आणि आच असलेले सुजाण भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे आभारच मानतील. निवडणुका जाहीर होत असताना राजकीय पक्षांची ही देणगी दौलत समोर आणावी लागली हे महत्त्वाचे. या रोखे तपशिलास रोखता येईल तितके रोखावे असा प्रयत्न त्यांचा ठेका घेतलेल्या स्टेट बँकेने करून पाहिला. पण ते काही जमले नाही. या अशा प्रयत्नामुळे स्टेट बँकेची अब्रू गेली ती गेलीच. पण त्याच वेळी केंद्रीय यंत्रणांच्या बरोबरीने राष्ट्रीयीकृत बँकांच्या सरकारीकरणाचा प्रयत्नही कसा सुरू आहे हे दिसून आले. या बँका सरकारी मालकीच्या आहेत; हे खरे. पण सरकारी मालकीच्या याचा अर्थ सत्ताधारी पक्षाच्या मालकीच्या असे नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या दट्ट्याने सरकारी मालकीचे याचा हा खरा अर्थ समजावून सांगितला गेला. हा या रोखे निकालाचा आणखी एक फायदा. त्याचा अन्वयार्थ निवडणूक घोषणांच्या पार्श्वभूमीवर लावणे आवश्यक. कारण निवडणुकांत सर्व राजकीय पक्षांस समान संधी असणे अत्यावश्यक. अपारदर्शी रोख्यांमुळे ती नाकारली जात होती आणि हे साधे सत्य सत्ताधारी आणि त्यांचे विचारांधळे समर्थक अमान्य करत होते. म्हणूनच रोख्यांचा तपशील उघड करण्यास त्यांचा विरोध होता. यावर सगळ्याच पक्षांना या रोख्यांतून देणग्या दिल्या गेल्या, एकाच पक्षाला का दोष , असा एक बावळट युक्तिवाद सध्या सुरू आहे. तथापि हे सत्य अमान्य कोण करते, हा त्याचा प्रतिवाद. एखादा डाव्या पक्षांचा अपवाद वगळल्यास सर्वच राजकीय पक्षांस या रोख्यांचा कमीअधिक लाभ झालेला आहे, हे कोणीही अमान्य करणार नाही. परंतु तो सत्ताधारी पक्षास अधिकाधिक झाला हेदेखील कोणी अमान्य करणार नाही. एरवी तोटयात असलेली एअरटेल, कोणी मेधा इंजिनीअरिंग , महाराष्ट्रात सरकारी गृहबांधणीसाठी विख्यात शिर्के कन्स्ट्रक्शन्स , ज्यास तुरुंगात डांबावयास हवे अशी फोकनाड लॉटरी कंपनी इत्यादींनी हजारो कोटी रुपयांचा दानधर्म राजकीय पक्षांस करावाच का? यातील काही कंपन्यांवर ईडी-पीडा येणे आणि लगेच त्यांच्या तिजोऱ्यांचे दरवाजे राजकीय पक्षांस खुले होणे यांचा अर्थ काय? सध्याच्या तपशिलात या सगळ्या देणग्या सत्ताधारी पक्षालाच मिळाल्या असे म्हणता येत नाही, हे मान्य. तरी सत्ताधारी पक्ष आणि त्यांच्या समर्थकांस इतके विव्हळण्याजोग्या वेदना होण्याचे कारण काय? या देणग्या सत्ताधारी पक्षांस खरोखरच मिळालेल्या नसतील तर ते तपशिलांत जाहीर होईलच. त्यासाठी उलट या नवनैतिकवाद्यांनी स्वतःच आग्रह धरायला हवा. केंद्रीय अर्थविदूषी मंत्री निर्मला सीतारामन म्हणतात : या देणग्या आणि ईडी-पीडा, या कंपन्यांस कंत्राटे मिळणे यांचा काही संबंध नाही. तो तसा खरोखरच नाही, हे सिद्ध करण्यासाठी तपशील तर जाहीर व्हायला हवा! या सर्व तपशिलाशिवाय देणग्या, धाडी, कंत्राटे यांचा काही संबंध नाही यावर संबंधित पक्षाशी संबंधित स्वयंसेवक आदींनी विश्वास जरूर ठेवावा. इतरांनी तो शब्द प्रमाण मानण्याचे काय कारण? यातील ज्ञात दानशूरांचा सरकारी व्यवहारांशी संबंध तरी लावता येतो. पण अज्ञात, बेनामी देणगीदारांचे काय? यात काही देणगीदार परदेशस्थही असू शकतात. त्यांच्या स्थानिक उपकंपन्या वा हस्तकांनी रोखे खरेदी करून ते हितसंबंध रक्षणाची हमी देणाऱ्या राजकीय पक्षांस दिलेले असणे सहज शक्य आहे. कारण ज्या पद्धतीने या रोख्यांची रचना करण्यात आली त्यामुळे ते चलनी नोटांसारखेच वापरले गेले. फरक इतकाच की या रोखेरूपी चलनाचा तपशील फक्त आणि फक्त स्टेट बँक आणि त्यामुळे केंद्र सरकार यांनाच माहीत. अशा वेळी ह्यन खाऊंगा.. वगैरे भीष्मप्रतिज्ञा करणारे आणि त्यांचे नवनैतिकवादी समर्थक यांनी तपशील खणून काढला जावा यासाठी आग्रही रहायला हवे. ते राहिले बाजूला. उलट या वगार्चे वर्तन ह्यआपले ठेवावे झाकून आणि विरोधकांचे पहावे वाकून असे दिसते; ते का? यावरही हा वर्ग देणगीदारांच्या गुप्ततेच्या अधिकाराचे काय , इत्यादी तत्त्ववादी प्रश्न उपस्थित करताना दिसतो. ते केविलवाणे हास्यास्पद ठरतात. त्याची कारणे दोन. एक म्हणजे सरकार, न्यायालय वा चौकशी यंत्रणा मागतील तेव्हा हा तपशील उघड केला जाईल, अशी अट पहिल्यापासूनच या रोखे व्यवहाराबाबत आहे. तेव्हा रोखे खरेदीदारांच्या अटींचा यामुळे बिलकूल भंग होत नाही. आणि दुसरे असे की या रोख्यांची माहिती सरकारपासूनही गुप्त राहील अशी व्यवस्था असती तर तीस कोणाचा आक्षेप असण्याचे कारण नव्हते. पण तसे नाही. हे रोखे कोणी खरेदी केले, कोणास दिले, कोणत्या राजकीय पक्षाने ते वटवले हा तपशील सत्ताधाऱ्यांस नेहमीच कळणार, अन्य कोणास नाही, ही यातील असमानता होती. ती दूर झाली. त्यामुळे आता सत्ताधाऱ्यांसही आपले झाकून ठेवणे अवघड होईल. त्यांच्या समर्थकांस पोटशूळ उठलेला दिसतो तो यामुळे. सगळ्यांचेच सगळे काय ते उघडयावर येणे ही समानता. निवडणुकांच्या तोंडावर त्याची गरज होती. कारण यातून हमाम में सब नंगे या सत्यवचनाचा प्रत्यय येतो, हे नाही. तर आपली व्यवस्था अद्यापही किती सडकी आहे हे यातून उघड होते, म्हणून. इतके दिवस विरोधकांच्या भ्रष्टाचारावर आसूड ओढणारेही वास्तवात तितके वा काही प्रमाणात अधिकच भ्रष्ट असू शकतात हे यातून दिसते. आधीच्या राजवटींत महत्त्वाच्या निर्णयांचा अधिकार असणारे मंत्री वा संबंधित पक्षाच्या नावे देणग्या घेत. निवडणूक रोख्यांमुळे या व्यक्तींची जागा व्यवस्थेने घेतली. इतकाच काय तो फरक. पण तो गुणात्मक नाही. तसा तो असता तर तोटयातील कंपनीने राजकीय देणग्या का द्याव्यात? त्यासाठी त्यांनी पैसा आणला कोठून? तो त्यांच्याकडे होता तर मग ताळेबंदात दाखवलेल्या तोटयाचे काय? या देणग्या दिल्या गेल्या आणि काही कंपन्यांस लगेच सरकारी कंत्राटे मिळाली; हे कसे? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली नाहीत तरी या निवडणूक हंगामात त्यावर चर्चा तर होईल, हेदेखील महत्त्वाचे.

# बदलते राजकीय नेपथ्य...

लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून, नरेंद्र मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीवरच एका अर्थाने शिक्कमोर्तब होणार आहे. या काळात मोदींनी राबवलेले धोरण, योजना, केलेला कारभार आणि विरोधकांबाबतचे त्यांची भूमिका, विरोधकांचे राजकारण अशा अनेक बाबी पुन्हा चर्चेत येऊ लागल्या आहेत. गाजलेली कथा आहे. त्या कथेत एक डौलदार, धारदार मांजा असलेला पतंग आकाशात झेप घेऊ लागतो. त्याचा रुबाब पाहून लोक अचंबित होतात. पतंग जसजसा वर जातो, तसतसा आकाश व्यापू लागतो. पण त्यात एक दोष असतो, तो दुसऱ्या कुठल्याही पतंगाला जवळ फिरकूच देत नाही. त्यांना मात देत असतो. सायंकाळ होते तेव्हा आकाशात हा एकमेव पतंगच राहणार, असे लोकांना वाटू लागते. त्याचवेळी एक छोटा पतंग हळूहळू वर येतो. सर्वांना वाटते छोट्या पतंगाचाही आता पत्ता कट होईल. पण अस्तमानी सूर्याच्या साक्षीने डौलदार पतंगावर मात करून छोटा पतंग आकाशात पुढेपुढे जातच राहतो... पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीला येत्या मेमध्ये दहा वर्षे होतील. त्यांच्या कार्यकाळाची तुलना स्वाभाविकच काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीच्या (यूपीए) डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दीशी होते. मुळात डॉ. सिंग राजकारणी नव्हते. ते थोर अर्थतज्ज्ञ.देशाची आर्थिक स्थिती हलाखीची असताना नव्वदच्या दशकात तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव सरकारात ते अर्थमंत्री होते. त्यांच्याच काळात देशात खुल्या आर्थिक धोरणाचा श्रीगणेशा केला. अशा अर्थतज्ज्ञाला अनपेक्षितपणे २००४मध्ये पंतप्रधानपद मिळाले. त्यांनी सकारात्मकपणे कारभार करत देशाच्या विकासाचे अनेक टप्पे गाठले.



**डॉ. सिंग** कधीही लोकनेते नव्हते. पंतप्रधान मोदींना संवादकला अवगत आहे. ते हिंदी पट्ट्यामध्ये लोकप्रिय आहेत. परंतु ती लोकप्रियता त्यांना दक्षिण भारतात नाही. मीडिया मॅनेजमेंट डॉ. सिंग यांनी कधीही केले नाही; ते मोदी लिलया करतात. डॉ. सिंग यांच्या कार्यकाळातील महत्त्वाच्या योगदानाचा धावता आढावा घेतला, तर अणुकरार, शिक्षणाचा अधिकार, माहितीचा अधिकार, अन्न सुरक्षा, मनरेगा अशा विविध कायद्यांमुळे देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये मोठे बदल झाले. या काळात भारतातील २७कोटी जनता गरीबीतून बाहेर आल्याचा अहवाल जागतिक बँकेने दिला. त्या काळातही संकटे मोठी होती. २००८मध्ये जागतिक मंदी असताना या संकटापासून देशाला डॉ. सिंग यांनी दूर ठेवले होते. या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीवर नजर टाकल्यास काय दिसते. पहिला सर्वात मोठा निर्णय हा नोटाबंदीचा होता. त्यानंतर जीएसटी . या दोन्हीही निर्णयाचे नाव ते आज घेत नाहीत. निवडणूक रोख्यांचा निर्णय त्यांच्याच सरकारचा होता. त्याबाबतची वस्तुस्थिती देशासमोर आहे. २०१४ मध्ये काँग्रेस राजवटीला विरोध करत काँग्रेसमुक्त भारत अशी घोषणा देत अच्छे दिन चे स्वप्न दाखवत मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सत्तेत आली. काँग्रेस भ्रष्ट असल्याचे जनमानसावर बिंबवण्यासाठी समाजसेवक अण्णा हजारेंच्या उपोषणाचा खुबीने वापर केला गेला.विकासाचे आदर्श मॉडेल म्हणजे गुजरात मॉडेल असे देशवासियांच्या मनावर ठसवण्यात मोदी यशस्वी झाले. मोदींनी संकट काळात साथ देणाऱ्या लालकृष्ण अडवाणी यांना दूर केले. कोणीतरी कठोर नेता देशाला हवा अशा बनवलेल्या लाटेवर मोदी सहजपणे स्वार झाले.या काळात मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने मैलाचा दगड ठरतील, असेही अनेक निर्णय घेतले. तेही नाकारता येणार नाहीत. महत्त्वाचे म्हणजे, परराष्ट्रधोरणात आक्रमकता आणली, अनेकानेक देशांना भेटी देत संबंध सुधारण्यावर भर दिला. हवामानविषयक कॉप परिषद, जी-२० देशांच्या शिखर परिषदेसह अनेक आंतरराष्ट्रीय बैठकांमध्ये भारताच्या भूमिका आग्रहाने मांडल्या. शिवाय, स्किल इंडिया, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, डिजिटल पेमेंट, डीबीटी अशा प्रशासकीय आणि कामकाजात सुधारणात्मक पावले उचलली. नवे शैक्षणिक धोरणही आणले. विरोधकही ते नाकारणार नाहीत. पण वाढलेली महागाई, कोविड काळातील घडले, बिघडले; बेरोजगारीचा प्रश्न, युवकांमधील अस्वस्थता याकडे केलेला कानाडोळा याची किंमत त्यांच्या नेतृत्वाखालील आघाडीला चुकवावी लागणार आहे. त्याबरोबरच मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने आकर्षक वेष्टनात काँग्रेस सरकारने सुरू केलेल्या अनेक योजनांना नव्या स्वरुपात मांडले. बुलेट ट्रेन, स्मार्ट सिटी, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, मुद्रा अशा घोषणाचा तडाखा लावला. राम मंदिराची निर्मिती, राज्यघटनेतील ३७० कलम काढणे आणि नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) लागू करण्यासारख्या निर्णयांमुळे मोठा वर्ग सुखावला.याच काळात देशात हिंदू-मुस्लिम अशी दरी रुंदावली.

दुसरीकडे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था, विश्वगुरू भारत इत्यादी घोषणांचा पाऊस पडू लागला. नोटाबंदीची अंमलबजावणी केली खरी पण ती एवढ्या विस्कळीत पद्धतीने झाली की, सामान्य भारतीयांचे कंबरडे मोडले. मोदींनी स्विस बँकेतील काळा पैसा आणण्याचे दिलेले आश्वासन कोठे विरून गेले, हे कोणाला समजलेही नाही. सूडाचे, द्वेषाचे राजकारणआता लोकसभा निवडणूक जाहीर झाली आहे. देशात सात आणि महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान होईल. मोदी शेवटच्या मिनिटापर्यंत घोषणा करण्यात आणि वेगवेगळे निर्णय घेण्यात व्यग्र होते. त्याच्याच आधारावर अबकी बार चारसौ पारची घोषणा दिली. त्याआधी ईडी, सीबीआयच्या धास्तीने विरोधी पक्षातले, ज्यांच्यावर विविध आरोप झाले, असे राष्ट्रवादीचे नेते अजित पवार, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ पक्ष फोडून भाजपबरोबर आले; तर काँग्रेसचे अशोक चव्हाण भाजपवासी झाले.

देशातही तेच चित्र होते. ज्यांच्यावर भ्रष्ट असल्याचे आरोप केले त्यांना आपल्या महायुतीत घेत पदे बहाल करण्याचे जे नाट्य महाराष्ट्रात आणि वेगवेगळ्या राज्यांमध्ये घडले; त्यामुळे भाजपची प्रतिमा स्वच्छ राहिली असेल, असे मानण्याचे कारण नाही.भाजप अंतर्गत मोदींशी स्पर्धेत येऊ शकतात, असे वाटणा[illegible]या नितीन गडकरी यांच्यासारख्या कर्तृत्ववान नेत्याला मोदींच्या काळात सदैव अपमानित करण्यात आले. मोदींच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात कधी थाळ्या वाजवून, तर कधी पुलवामा हल्ल्यातील हुतात्म्यांना श्रद्धांजलीसाठी आवाहन करून भारताला विश्वात गौरवाचे स्थान निर्माण केल्याचा अभास निर्माण करण्यात आला; तो खरा नसल्याची जाणीव भारतीयांना होऊ लागली आहे. त्यापासून लक्ष विचलित करण्यासाठी समान नागरिकत्व कायदासारख्या बाबी पुढे आणल्या गेल्या. मोदींच्या कारभाराचे विश्लेषण करताना काही चांगल्या गोष्टी घडल्या; पण देशाची सामाजिक घडी मात्र बिघडली, असे म्हणता येईल. देशातील एकूण पाहणीचे निष्कर्ष सांगतात की, मोदींच्या एनडीएला चारशेपार नेण्याचे ध्येय आव्हानात्मक आहे. महाराष्ट्र, बिहार ही राज्ये निर्णायक ठरणार आहेत. राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, तेजस्वी यादव, कन्हैय्या कुमार, अखिलेश यादव यांच्यासारख्या विरोधी तरुण नेत्यांनी मोदींसमोर आव्हान उभे केले आहे. अदानी-अंबानी यांच्यासारख्या मूठभर उद्योगपतींना मोदी मदत करत आहेत, ही प्रतिमा उभी करण्यात विरोधी नेते यशस्वी होत आहेत.

देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) एकीकडे वाढत असले तरी देशात आर्थिक विषमतेची दरी अधिकाधिक रुंदावत असल्याची विचारवंत आणि तज्ज्ञांची भीती खरी ठरत आहे. दुसरीकडे महागाईचे सामान्यांना बसणारे चटके तीव्र होत आहेत. कृषी कायद्यासाठी वर्षभर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर गोळीबार करणे, त्यांच्या वाटेत खिळे गाडण्याचे काम इंग्रजांसारख्या जुलमी राजवटीनेही केले नव्हते, ते मोदी सरकारने करून दाखविले.परंतु, विरोधातील सूर बंद करायचा, त्यासाठी सीबीआय, ईडीसारख्या सरकारी यंत्रणांचा खुलेआम वापर करायचा. ही वेळ लोकप्रियतेच्या शिखरावरील नरेंद्र मोदींवर का यावी?

अर्थात, गेल्या दहा वर्षांत अनेकार्थाने केवळ भारतीयच नाही तर जगाच्या नकाश-ावर ज्याला मोदीपर्व म्हणता येईल तसे पर्व अवतरले, हे विरोधकांनाही मान्य करावे लागेल. मात्र, मोदींनी आणि त्यांच्या पक्षाने सूडाचे राजकारण केले. त्यामुळेच लोकसभेची निवडणूक म्हणजे डौलदार पतंगाच्या गोष्टीशी जवळ जाणारी तर नाही ना, अशी शंका येते.

# अग्निशमन दलाच्या ताफ्यात अत्याधुनिक अग्निशमन वाहन दाखल

## दोन्ही शहरातील उंच इमारतींच्या अग्निसुरक्षेचा प्रश्न मार्गी लागणार

**बदलापूर :** अग्निशमन दलाच्या ताफ्यात अत्याधुनिक अग्निशमन वाहन दाखल झाले आहे. जवानांना सुमारे २२ मजल्यापर्यंत उंच इमारतींवर पोहचण्यासाठी हे वाहन सक्षम आहे. अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या अग्निशमन दलासाठी संयुक्तपणे वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. त्यामुळे या दोन्ही शहरातील उंच इमारतींच्या अग्निसुरक्षेचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

रविवारी बदलापूर एमआयडीसी परिसरातील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. याचवेळी या अत्याधुनिक अग्निशमन वाहनाचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी योगेश गोडसे, माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, अंबरनाथचे माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र वाळेकर, माजी नगरसेवक शरद तेली, किरण भोईर, रमेश सोळसे, स्वामी डार्विन, राजेश शर्मा, अग्निशमन अधिकारी भागवत सोनोने आदी उपस्थित होते.

काही महिन्यांपूर्वीच फिनलँड येथून आणण्यात आलेल्या १३ कोटींच्या अत्याधुनिक वाहनाला ७० मीटर उंचीची हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म शिडी आहे. यामुळे वाहनाच्या मदतीने जलद, सुरक्षित २२ मजल्यांपर्यंतच्या इमारतीवर पोहचणे सहज शक्य होणार आहे. वाहनावर खालच्या बाजूला एक आणि वरच्या बाजूला एक अशा दोन ऑपरेटर केबिन आहेत. त्यात बसून आवश्यकतेनुसार वाहनाची दिशा बदलणे शक्य होते.



त्यामुळे उंच इमारतीवर आग लागल्यानंतर ती लवकरात लवकर विझवण्यासाठी अग्निशमन दलाला हे अत्याधुनिक अग्निशमन वाहन सहाय्यभूत ठरणार असल्याचे अग्निशमन अधिकारी भागवत सोनोने यांनी सांगितले. शहरातील बहुतांश रस्ते काँक्रीटचे झाले आहेत. मात्र एमआयडी परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे अद्याप काँक्रीटीकरण झालेले नाही. त्यामुळे विशेषतः कंपन्यांना मालवाहतूक करताना काहीशी गैरसोय होत होती. मात्र आता या भागातील काँक्रीट रस्त्यांच्या कामाचे शनिवारी भूमिपूजन झाल्याने लवकरच हे रस्तेही काँक्रीटचे होऊन कंपन्यांची, तसेच स्थानिक रहिवाशांची होत असलेली गैरसोय टळणार आहे.

- अंबरनाथ व कुळगाव बदलापूरनगर परिषदेची संयुक्त अग्निशमन समिती गठीत झाल्यानंतर या दोन्ही नगर परिषदांनी ७० मीटर उंचीची हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म शिडी असलेले अग्निशमन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घेतला.
- त्यानुसार कुळगाव बदलापूर नगर परिषदने मार्च २०२० मध्ये व अंबरनाथ नगर परिषदने एप्रिल २०२० मध्ये स्थायी समितीत याचा ठराव मंजूर केला. दोन्ही नगर परिषदांनी या वाहनासाठी निम्मा निम्मा खर्च केला आहे. या अग्निशमन वाहनाचा अंबरनाथ व बदलापूर या दोन्ही शहरांना उपयोग होणार आहे.

# कचराळी तलावावर होणार पर्यावरणपूरक होळी साजरी



**ठाणे :** ठाणेकरांची ठाणेकरांसाठी आयोजित केलेल्या पर्यावरणपूरक अनोखी होळीचे आयोजन सोमवार, २५ मार्चला कचराळी तलाव खुला रंगमंच, महापालिका मुख्यालयासमोर, पाचपाखाडी येथे सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत केले आहे. स्वत्व व उत्सव ठाणे आयोजक असून माजी परिवहन समिती सदस्य राजेश मोरे, माजी नगरसेविका रुचिता मोरे यांचे सहकार्य लाभले आहे.

कोविड काळात आपापल्या घरात कलात्मक चेहरे रंगवून रीलद्वारे शेअर करीत अनोखी होळी साजरी केली होती. मागील वर्षी तब्बल १००० च्यावर ठाणेकरांनी अनोख्या होळीत सहभागी होत चेहरे रंगवून घेतले. यंदा स्वत्वचा हा उपक्रम उत्सव ठाणे निमित्ताने जोडल्या गेलेल्या विविध संस्था व कलाकारांना सोबत घेऊन साजरा करण्याचा मानस आहे. चेहरे रंगवणे, ड्रम सर्कल, गायन, वादन, नृत्य, हास्यकविता, स्टँडअप असे कार्यक्रम सादर होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# मांज्यात अडकलेल्या कबुतराची सुटका

**ठाणे :** स्ट्रीट लाईट पोलवर मांज्यात अडकलेल्या कबुतराची अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली आहे. वर्तकनगर, शास्त्रीनगर येथील भैय्यासाहेब इंदिसे यांच्या कार्यालय जवळ शास्त्रीनगर नाका येथे स्ट्रीट लाईट पोलवर एक कबूतर मांज्यात रविवारी दुपारी १.३०च्या सुमारास अडकले होते. या घटनेची माहिती पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागातर्फेनिखिल शिरसाट यांनी दिली. त्यानुसार आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले. त्यांनी मांज्यात अडकलेल्या कबुतराची सुटका केली.



# BMC ki guarantee: Potholes this year, too



**Mumbai** : Despite several assurances, it is clear now that the concreting of roads in south Mumbai cannot start before the monsoon. The BMC invited tenders for the third time as it didn't get a response to the second tender invited in February. The contractor who was selected last year, could not begin work on time. The BMC invited a tender in December 2022 worth Rs 6,080 crore excluding 18 per cent GST to concrete 397 km of city roads. Of this, road works of approximately Rs 1,230 crore were in south Mumbai and the BMC awarded a contract for it in February 2023. However, the work was not started despite several reminders from the BMC. The BMC cancelled the work order and invited the tenders once again on February 1 for the same work at the estimated cost of Rs 1,365 crore. "But as the corporation hasn't received a response, it has invited the tender for the third time. The date for submitting tender documents is April 5, 2024," said an official from the BMC.

Even if the BMC receives a response this time, the process for issuing work orders will take another month and a half. The road works cannot start after May end due to the monsoon. Work will then start only after the monsoon. Municipal Commissioner I S Chahal had assured the high court in September 2022 that the BMC would concrete all roads within two-and-a-half years. The concreting of roads in the western and eastern suburbs is on but at a very slow pace with only 20 per cent of them completed in one year. But despite the slow speed, the BMC floated another tender for the remaining 400 km, at Rs 6,250 crore.

Tareek pe tareek!

The city works were awarded to the contractor 'Roadway Solutions India Infra Limited' in Feb 2023.

Despite repeated notices, the contractor failed to initiate the work.

On November 9, 2023, the commissioner approved the cancellation of the contract.

The contractor appealed the contract cancellation in the high court.

In December 2023, the road department issued tenders for the pending work.

The court intervened, staying the tender process and instructing the BMC to hear the contractor's side.

Following the hearing, the corporation imposed a fine of R64 crore on the contractor.

The high court upheld the decision of the civic body, refusing to intervene.

# Royal Challengers Banglore: Women turn it to "Ee Sala Cup Namdu!"



Mumbai, The Royal Challengers Banglore, one of the most recognised franchises in the history of the Indian Premier League is known for its richness in the brand of cricket they play. Their team's slogan "Ee Saala Cup Naamde" which means "This year the trophy will be ours" is the driving force for the franchise every year, whether it is a men's or women's team. In the WPL 2024, the Royal Challengers Banglore secured their maiden title against Delhi Capitals at the Arun Jaitley Stadium. The RCB's women team showcased extraordinary skills with the ball in the first essay as the Delhiites were bowled out for just 113 runs. Having to chase a target of 114 runs, the batters did their job right with the willow. Richa Ghosh's under-pressure boundary was a highlight of the match as she struck it when they needed three runs off just four deliveries. After this win of Royal Challengers Banglore, people have started comparing men's teams with women's. The fact that has to be accepted is that the women's team displayed a stupendous effort to claim the title in just their second season. But that doesn't mean the RCB's men aren't making efforts. In IPL 2023, Royal Challengers Banglore's captain Faf du Plessis was the second leading run-scorer of the season as he amassed 730 runs for the side. Indian stalwart Virat Kohli was in the fourth place with 639 runs. The record for the most sixes in IPL 2023 was in the name of Du Plessis. She smashed 36 sixes in just 14 matches of the cash-rich league. Glenn Maxwell was the fourth on the list with 31 sixes in 14 matches. Kohli (65) was fifth in the top five players with the most fours in the season. The record for the most runs in a single season is also in the name of Virat Kohli. In the year 2016, the right-hander accumulated 973 runs in just 16 matches. The record is unbroken to date. The critics need to understand that, winning and losing are just part and parcel of the game and the efforts taken by the players have to be appreciated the most. Coming to the WPL 2024, Sophie Molineux helped the side with a breakthrough. The left-arm spinner bagged three important wickets of Delhi Capitals. Followed by Shreyanka Patil with four wickets and Sobhana Asha with three wickets. The spin troika single-handedly destroyed Delhi Capitals in their backyard. The hosts were bowled out for just 113 runs. RCB's batting lineup did their job with the willow. Royal Challengers Banglore's Ellyse Perry finished the league as the highest run-scorer with 347 runs.

# मतदानाचा टक्का घसरण्याची शक्यता

## महाराष्ट्रात यंदा लोकसभेला एप्रिलऐवजी मे महिन्यात मतदान

■ **डोंबिवली :** अखेर लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले. संपूर्ण देशातील लोकसभेची निवडणूक ही यंदा सात टप्प्यात होणार आहे. एप्रिल आणि मे महिन्यात पाच टप्प्यात महाराष्ट्रातील निवडणुका होणार आहेत. महाराष्ट्राचा विचार करता मागील लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये हीच निवडणूक महाराष्ट्रात चार टप्प्यात म्हणजे ११ एप्रिल ते २९ एप्रिलदरम्यान झाली होती. लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा निकाल त्यावेळी २३ मे रोजी लागला होता. यंदा तोच निकाल ४ जून रोजी लागणार आहे. एकंदरीत एप्रिल-मे महिन्यात उन्हाळी सुट्ट्यांमध्ये निवडणुका ,वाढता उकाडा व मतदानासाठी

■ लोकसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया २०१९ प्रमाणे जशी बहुतांश मतदारसंघात एप्रिल महिन्यात राबवली होती, तशी यावेळी करायला हरकत नव्हती. २०१९ मध्ये फक्त काही निवडक ठिकाणी काही राज्यात शेवटचा टप्प्यातील मतदान १९ मे रोजी घेण्यात आले होते.

■ आता यावेळी शेवटचा मतदानाचा टप्पा जून आहे. मे महिन्यात सर्वाधिक उकाडा असतो. त्यामुळे या सर्वांचा परिणाम मतदानावर होऊन मतदानाची टक्केवारी कमी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.




सलग आलेल्या सुट्ट्या या सगळ्याचा परिणाम होऊन मतदानाची टक्केवारी घसरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

यावेळी महाराष्ट्रात एप्रिलमध्ये एकूण १३ मतदारसंघात निवडणूक होणार आहेत. त्यात पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी रामटेक,नागपूर, भंडारा - गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या ५ मतदारसंघांचा समावेश आहे. तर दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशीम, हिंगोली, नांदेड व परभणी या ८ मतदारसंघांचा समावेश आहे.

४८ पैकी ३६ मतदारसंघात मे महिन्यात निवडणुकीसाठी मतदान होणार आहेत. त्यात तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी रायगड, बारामती, धाराशिव ,लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणं गले या ११ मतदारसंघांचा समावेश आहे. तर चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजी नगर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या एकूण ११ मतदारसंघांचा समावेश आहे. शेवटच्या पाचव्या टप्प्यात धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबई उपनगरातील ६ अशा एकूण १३ मतदारसंघांचा समावेश आहे.

मुंबई ठाणे परिसर, कोकण, पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा या महत्त्वाच्या मतदारसंघात मतदान मे महिन्यात होणार आहेत. मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक या जिल्ह्यातील मतदारसंघात २० मे रोजी मतदान होणार आहे. १३ आणि २० मे या मतदानाच्या दिवशी सोमवार आल्याने शनिवार, रविवार, सोमवार अशी सलग तीन दिवस सुट्टी मिळाल्याने चाकरमानी नक्कीच त्याचा फायदा घेऊन बाहेरगावी जाण्याचा प्लॅन करतील. याशिवाय शहरात स्थाईक असलेला मध्यम, उच्चवर्ग, शेतकरी हा शाळेला सुट्टी आणि कडक उन्हाळ्यामुळे आपल्या मूळ गावी किंवा बाहेरगावी फिरण्यास जात असतो. निवडणूक आयोग आणि राजकीय नेत्यांनी कितीही आवाहन केले तरी याबाबत मतदारांना त्याचे काही सोयरसुतक नसल्याने तो मतदानासाठी थांबत नाही, हा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे मतदानाची टक्केवारी हमखास घसरते.

एप्रिल आणि मे महिन्यात भारताच्या बहुतेक भागात उन्हाळा कडक असतो. उत्तर भारतात मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, दिल्ली इ. भागांत उष्माघाताने अनेक बळी जात असल्याचे दरवर्षी पाहण्यात येते. यावेळी तर गर्मीचे प्रमाण दरवर्षीपेक्षा जास्त असणार, असे आधीच भाकीत वर्तविण्यात आले आहे. त्यामुळे कडक उन्हात मतदार मतदानासाठी किती बाहेर पडतील? याबाबत शंका वाटत आहे.



### रुग्णालयाच्या मागे कुजलेला मृतदेह सापडला

■ **मुंबई :** गोवंडीच्या पूर्व उपनगरात एका इस्पितळाच्या मागे एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याची माहिती पोलिसांनी रविवारी दिली. शनिवारी रात्री उशिरा शताब्दी रुग्णालयाच्या मागे एका प्रवाशाने हा मृतदेह पाहिला. त्याने ही माहिती पोलिसांना दिली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असून मृत व्यक्ती ३५ ते ४५ वयोगटातील असल्याचे त्यांनी सांगितले. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही आणि पोलीस बेपत्ता झालेल्या व्यक्तींच्या तक्रारीवरून तपास करत असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

### वृद्ध व्यावसायिकाला वीज बिल फ्रॉडचा शॉक

■ **मुंबई :** वीज बिल अपडेट झाले नसल्याने वीजपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याची भीती घालून सायबर ठगांनी जुहूमधील एका वयोवृद्ध व्यावसायिकाला २ लाख ९७ हजार रुपयांना गंडा घातला आहे. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून जुहू पोलीस अधिक तपास करत आहेत. जुहूमधील ए. बी. नायर मार्ग परिसरात कुटुंबासोबत राहात असलेल्या तक्रारदारांचा सायकल विक्रीचा व्यवसाय होता. १० मार्चच्या दुपारी त्यांना अनोळखी मोबाईल नंबरवरून वीज बिल भरले नसल्याने रात्री साडेनऊ वाजता वीजपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचा मेसेज आला. घराची वीज बंद होऊ नये, या भीतीपोटी तक्रारदार यांनी मेसेज आलेल्या क्रमांकावर संपर्क केला, तेव्हा समोरून बोलणाऱ्याने टाटा इलेक्ट्रिसिटीमधून बोलत असल्याची बतावणी करत बिल अजून अपडेट झाले नसल्याचे सांगितले. बिल अपडेट करण्यासाठी त्यांच्याकडे क्रेडिट कार्ड क्रमांक व पॅनकार्ड क्रमांक मागितला. पुढे त्या व्यक्तीने ओटीपी नंबर घेत त्यांच्या खात्यातील २ लाख ९७ हजार लंपास केले.

### आमिष दाखवून सव्वालाखाला गंडा

■ **ठाणे :** मोबाईल आलेल्या संदेशात बँकेचे रिवॉर्ड पॉईंट देण्याचे आमिष दाखवत एका महिलेच्या बँक खात्यातून १ लाख २५ हजार रुपये लांबवल्याची घटना ५ मार्च रोजी घडली. याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बनावट कुरिअर वेबसाईटद्वारे नागरिकांची फसवणूक करणारा गजाआड

■ **मुंबई :** डीटीडीसी पॅकर्स अँड मूव्हर्स कंपनीची बनावट वेबसाईट तयार करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या १९ वर्षीय आरोपीला मालवणी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मोहीत अदालतीप्रसाद कनोजीया ऊर्फ सुरज कुमार असे या आरोपीचे नाव असून पोलिसांनी त्याच्याजवळून चार लाख ७४ हजार रुपयांचा ऐवज हस्तगत केला आहे.

मालाड पश्चिमेकडील न्यू महाकाली नगरमध्ये राहात असलेल्या वसीम शेख (३८) यांनी त्यांच्याजवळील रॉयल एनफिल्ड कंपनीची दुचाकी विक्री करण्यासाठी ओएलएक्सवर जाहिरात दिली होती. ही जाहिरात बघून छत्तीसगडमधून हरसिमरन सिंग ओबेरॉय यांनी त्यांना कॉल करत त्यांनी दुचाकी खरेदी करण्यासाठी व्यवहार ठरवला. हरसिमरन ओबेरॉय यांनी दुचाकी ट्रान्सपोर्ट करण्यासाठी डीटीडीसी पॅकर्स अँड मूव्हर्स या कंपनीची वेबसाईट शोधून त्या आधारे दोघांनी दुचाकी पोच करण्यासाठी तेथील दिलेल्या नंबरवर संपर्क साधला. त्यानुसार शेख यांनी दुचाकी सुरज नावाच्या व्यक्तीच्या ताब्यात दिली आणि त्यासाठी ट्रान्सपोर्ट खर्चाची रक्कमही देऊन टाकली. पण अनेक दिवस झाल्यानंतरही दुचाकी हरसिमरन सिंग ओबेरॉय यांच्याकडे पोच झाली नाही. अखेर, वसीम यांनी मालवणी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसार, अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून मालवणी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वाल्मिक पाटील, पोलीस उपनिरीक्षक अमर शिंदे, दिगंबर कुरकुटे यांच्या पथकाने गुन्ह्याचा तपास सुरू केला.

या प्रकरणाचे तांत्रिक पुरावे तपासले असता चार आरोपींनी डीटीडीसी पॅकर्स अँड मूव्हर्स या कंपनीच्या नावाने बनावट वेबसाईट तयार करून ही फसवणूक केल्याचे समोर आले. त्यातील चार आरोपींपैकी मोहित कनोजीया ऊर्फ सुरज कुमार हा नवी मुंबईतील कामोठे परिसरात असल्याची माहिती समोर येताच पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली आहे. शिफ्टींग वर्कर असलेल्या कनोजिया याच्या ताब्यात पोलिसांना फसवणूक प्रकरणातील दुचाकीही सापडली असून पोलिसांनी त्याच्याकडून दुचाकी ट्रान्सपोर्टसाठी ऑनलाइन पाठविलेली १४ हजार २९० रुपये रक्कमही हस्तगत केली आहे.

## महिला वकिलाला ३ .२० लाखांचा गंडा

■ **मुंबई :** बँक खात्याची गोपनीय माहिती चोरी करून सायबर लुटारूंनी वडाळ्यात राहणाऱ्या एका महिला वकिलाच्या खात्यातून ३ लाख २० हजार रुपये ऑनलाइन लंपास केल्याचा प्रकार समोर आला आहे. महिला वकिलाने दिलेल्या तक्रारीवरून वडाळा टीटी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

मूळच्या कोलकाता येथील रहिवासी असलेल्या ३५ वर्षीय महिला वकील या वडाळ्यात वास्तव्यास असून त्या लोअर परळमधील एका कंपनीमध्ये वकील म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे आणि आईचे एचडीएफसी बँकेच्या कोलकाता येथील



शाखेमध्ये बचत खाते आहे. खात्यात एकूण ४ लाख ३७ हजार ७०१ रुपये शिल्लक होते. बँक खात्यातून १८ यूपीआय व्यवहार होत एकूण ३ लाख २० हजार रुपये ऑनलाइन लंपास करण्यात आले. ५ मार्चपासून पैसे जात होते. खात्यात १ लाख १७ हजार ७०१ रुपये शिल्लक असल्याचा मेसेज तक्रारदार महिला वकिलाच्या मोबाईलवर आला आणि त्यांना या सायबर लुटीची माहिती मिळाली. तक्रारदार यांनी लगेचच बँकेच्या कस्टमर केअरला कॉल करून खाते ब्लॉक केले.

अज्ञात व्यक्तीने आपल्या आणि आईच्या नावावर असलेल्या संयुक्त खात्याचे अनधिकृतपणे नियंत्रण मिळवून यूपीआय ॲक्टिव्ह करत खात्यामधून पैसे काढल्याचे लक्षात येताच त्यांनी राष्ट्रीय सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार नोंदवली. त्यानंतर त्यांनी वडाळा टीटी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली आहे.

## पॉन्झी योजनेद्वारे ५४ कोटींची फसवणूक, चार्टर्ड अकाऊंटंटवर गुन्हा दाखल

■ **मुंबई :** पॉन्झी योजनेद्वारे लोकांची ५४.४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मुंबईतील चार्टर्ड अकाऊंटंटवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने भांडवल सुरक्षिततेची कायदेशीर हमी देऊन दरमहा २ टक्के परतावा देण्याचे आश्वासन देऊन गुंतवणूकदारांना आमिष दाखवले, अशी माहिती पोलिसांनी शनिवारी दिली. ओशिवरा पोलिसांनी तक्रारीच्या आधारे अंबर दलाल या चार्टर्ड अकाऊंटंटविरुद्ध फसवणूक आणि भारतीय दंडसंहितेच्या इतर संबंधित तरतुदीनुसार अन्य कलमांखाली एफआयआर नोंदवला. अंधेरी येथे भाड्याने घेतलेल्या जागेतून काम करणाऱ्या दलालाने आपले कार्यालय बंद केले असून गेल्या दोन दिवसांपासून तो फरार होता, असे अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी भांडवल सुरक्षिततेची कायदेशीर हमी देऊन दरमहा २ टक्के परतावा देण्याचे आश्वासन देऊन गुंतवणूकदारांना आमिष दाखवले. त्यासाठी आंतरराष्ट्रीय दलालांकडे नोंदणी केल्याचा दावाही आरोपींनी केला आहे. गुंतवणूकदारांना या महिन्याचे पैसे मिळाले नाहीत तेव्हा फसवणूक उघडकीस आली. दलालच्या कुटुंबीयांनी तो गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता असल्याचे सांगितले आणि ओशिवरा पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. काही गुंतवणूकदारांनी गुन्हे शाखेच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे संपर्क साधण्याचा विचार केला असल्याचे एका पीडितेने सांगितले.

## उड्डाणपुलावर बॅरिकेटिंगमुळे दोन टेम्पो अडकले

### दोन्ही बाजूकडील उंचीत तफावत

■ **भिवंडी :** भिवंडी शहरात वाहतुकीसंदर्भात नियोजन काही प्रमाणात होत नसल्याने वाहतूक कोंडी हा विषय नेहमीच चर्चेचा राहिला आहे. शहरातील मुंबई-आग्रा रोड या मुख्य रस्त्यावरील स्व. राजीव गांधी उड्डाणपूल हा अवजड वाहतुकीस बंद आहे. त्यासाठी आयुक्त प्रशासनाने उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूस हाईट बॅरिकेटिंग लोखंडी लावली आहे. मात्र दोन्ही बाजूकडील उंचीत तफावत असल्याने उड्डाणपुलाच्या तोंडावर वारंवार छोटे, टेम्पो वाहन धडकून अपघात होत आहेत.

उड्डाणपुलावर शनिवारी दोन्ही बाजूकडे टेम्पो अडकण्याच्या घटना घडल्या. त्यामुळे काहीकाळ



वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागला आहे. उड्डाणपुलाच्या धामणकर नाकाकडून येणाऱ्या मार्गावर हाईट बेरिकेटिंगची उंची २.२ मीटर आहे. तर वंजारपट्टी नाका बागे फिरदौस कडून येणाऱ्या रस्त्यावर हाईट बेरिकेटिंगची उंची ३ मीटर आहे. त्यामुळे छोटे टेम्पो यांना येथे लावलेल्या हाईट बॅरिकेटिंगचा अंदाज न आल्याने धामणकर नाक्याकडील बाजूस टेम्पो अर्धवट घुसून अडकून पडतात, तर बागे फिरदौस येथील हाईट बॅरिकेटिंगची उंची तीन मीटर असल्याने तेथून निघालेला टेम्पो पुढे धामणकर नाक्य कडे जाताना पुन्हा अडकून बसतो.

■ शनिवारी अशाच पद्धतीने या रस्त्यावर दोन्ही बाजूने दोन टेम्पो अडकून अपघात झाला. त्यामुळे या रस्त्यावर काही काळ वाहतूक कोंडीचा सामना सुद्धा करावा लागला. भिवंडी महानगरपालिका आणि वाहतूक विभाग यांच्या समन्वयाने या उड्डाणपुलावर दोन्ही बाजूस हाईट बॅरिकेटिंग लावले गेले आहेत.

■ परंतु त्यांनी किमान दोन्ही बाजूकडील उंचीबाबत समानता बाळगायला हवी होती. या गोष्टीचे तारतम्य या दोन्ही प्रशासन यंत्रणांनी बाळगले नसल्याने त्याचा त्रास टेम्पोचालकांना, नागरिकांना होत असल्याची माहिती नागरिकांनी दिली.



### पाचपाखाडी येथील रस्त्यावर तेल सांडले

■ **ठाणे :** पाचपाखाडी येथील रस्त्यावर तेल सांडल्याची घटना रविवारी पहाटे घडली. या घटनेची माहिती प्राप्त होताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी दाखल झाले. त्यावेळी पाचपाखाडी सेवारस्त्यावर टाटा मोटर्स शोरूम समोर रस्त्यावर तेल सांडले होते. यावेळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी रस्त्यावर सांडलेल्या तेलावर माती पसरवली.

## ठाण्यात दोन ठिकाणी आग, सुदैवाने जीवितहानी टळली

■ **ठाणे :** उथळसर प्रभाग समिती समोर असलेल्या रुग्णालयात शुक्रवारी रात्री अचानक आग लागली. आगीची दुसरी घटना शनिवारी पहाटे खारटनरोडवर घडली. तिथे असलेल्या चहाच्या दुकानात वरच्या मजल्यावर आग लागली होती.

या दोन्ही घटनेत वित्तहानी झाली, सुदैवाने जीवितहानी टळली, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. मिळालेल्या माहितीनुसार, उथळसर प्रभाग समिती समोर असलेल्या धनक क्लिनिकमधील बेड व इतर वैद्यकीय साहित्याला रात्री ११ च्या सुमारास किरकोळ आग लागली. आपत्ती व्यवस्थापन कक्ष कर्मचारी व अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर लगेच नियंत्रण मिळवले. दुसरी घटना शनिवारी पहाटे घडली. सिडको बस स्टॉप जवळ असलेल्या चहाच्या दुकानाच्या पहिल्या मजल्यावर साठवण्यात आलेल्या पुठ्ठ्याला, तसेच प्लास्टिक साहित्याला आग लागली. घटनास्थळी महावितरण कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. आग लागल्याने इलेक्ट्रिक वायरिंग व काही वस्तू, प्लास्टिक व थर्माकोल साहित्य जळून नुकसान झाले.

## सूर्या नदीवरील धोक्याचा प्रवास लवकरच संपणार?

### ▮ कोशेसरी ते सोलशेत गावकऱ्यांना दिलासा ▮ विद्यार्थी, ग्रामस्थांचे हाल थांबणार

■ **डहाणू :** धामणी धरणाच्या उशाला वसलेल्या डहाणू तालुक्यातील कोशेसरी भवाडी विक्रमगड तालुक्यातील कासा बुद्रुक, सोलशेत बेटावरील गावांना जोडणाऱ्या सूर्या नदीवर पुलाचे शुक्रवारी भूमिपूजन करण्यात आले. १४ वर्षाच्या अथक पाठपुरावा केल्यानंतर हा प्रवास संपणार आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हा परिषद सदस्य शैलेश करमोडा आदींसह मान्यवर उपस्थित होते.

येथील गावकरी, विद्यार्थी, रुग्ण, गरोदर मातांना अद्याप बोटीनेच जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. सूर्या नदीवर पूल नसल्याने डहाणू तालुक्यातील गावकरी कोशेसरी ते सोलशेत, कवडास, कासा बुद्रुक, कोशेसरी ग्रामस्थ बोटीनेच करत आहेत. लवकरात लवकर सूर्या नदीवर पुल बांधावा, अशी ग्रामस्थांची मागणी होती.

डहाणू तालुक्यातील असेच एक दुर्गम गाव म्हणजे कोशेसरी भवाडी परिसर. कोशेसरी हे गाव धामणी नदीच्या काठावर आहे. धामणी धरणाचा विसर्ग या नदीतून होत असल्याने नदीचे पात्र अफाट आहे. त्यामुळे पुराचा मोठा फटका या गावाला बसतो. गावातून दोन्ही तालुके तसे ८० किमी अंतरावर आहेत. मुलांना शिक्षण द्यायचे तर गावात बस येत नाही. अशावेळी बोटीतून पलीकडे किनाऱ्याला उतरायचे आणि तीन किमी अंतर चालत जाऊन तेथून खासगी वाहनाने पुढचा प्रवास करावा लागत आहे.



**नजीकचा प्रवास दळणवळणाच्या सुविधांअभावी तुटलेला**

◆ धामणी धरणातून पाण्याचा विसर्ग झालेले पाणी सूर्या नदीतून वाहून नेले जाते. नदीने कोशेसरी व सोलशेत येथे डहाणू आणि विक्रमगड तालुक्याच्या सीमा अधोरेखित केल्या आहेत. सूर्या नदीमुळे डहाणू तालुक्यातील एकूण महसूल गावे २९ व विक्रमगड तालुक्यातील १७ महसूल गावे विभागली गेली आहेत. सूर्या नदीवर पूल नसल्याने सायवन, उधवा, दादरा नगर हवेली, दिवशी, दाभाडी, किन्हवली, सायवनहून गांगोडी, शेणसरी जवळचा प्रवास दळणवळणाच्या सुविधांअभावी तुटलेला आहे. नदीवर पूल झाल्यास नागरिकांना तसेच वाहतूकदारांना कमी अंतराचा प्रवास करता येणार आहे.

## टास्क फ्रॉडच्या माध्यमातून फसवणूक करणारा गजाआड

■ **मुंबई :** डॉयल बायोटेक कंपनीचे कर्मचारी असल्याचे भासवत गुगल लोकेशन रिव्ह्यू करण्याचे टास्क पूर्ण केल्यास मोठा मोबदला देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळीतील एका साथीदाराला पश्चिम विभाग सायबर पोलिसांनी गजाआड केले आहे. संतोष सखाराम पाटोळे (५३) असे आरोपीचे नाव असून पोलिसांनी १२ बँक खात्यांमध्ये ३४ लाख ४३ हजार ४४८ रुपये गोठवले आहेत. पश्चिम विभाग सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या गुन्ह्यातील फिर्यादीला कॉल करणारी सिमरन नावाची टेलीग्राम प्रोफाईलधारक महिला, पूजा नावाची टेलीग्राम प्रोफाईलधारक रिसेप्शनिस्ट, विशाल नावाचा टेलीग्राम प्रोफाईलधारक मार्गदर्शक आणि कस्टमर सपोर्ट नावाच्या टेलीग्राम प्रोफाईलधारक यांनी संगनमत करून डॉयल बायोटेक कंपनीचे कर्मचारी असल्याचे भासवले आणि फिर्यादीला गुगल लोकेशन रिव्ह्यू टास्क पूर्ण केल्यास मोठा मोबदला देण्याचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढले. त्यांच्याकडून एक बनावट लिंक पाठवण्यात आली आणि ती उघडताच फिर्यादीला त्यावरील खात्यात रक्कम जमा असल्याचे दाखवण्यात आली. ती रक्कम फिर्यादीला मिळणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. मात्र ती काढण्यासाठी फिर्यादीकडून एकूण १२ लाख ७० हजार ६२० रुपये उकळले. आरोपींनी १० ते १८ डिसेंबर २०२३ या काळात विविध बँक खात्यात जमा करण्यास भाग पाडून कमिशन किंवा मूळ रक्कम परत न करता फसवणूक केली होती. याप्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून गुन्हे शाखेच्या सायबर कक्षाचे उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मागदर्शनाखाली पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्ताराम चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक अजय पाटील, दीपक तायडे यांच्या पथकाने तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला. दिव्यातील रहिवासी आरोपी पाटोळे याचा गुन्ह्यातील सहभाग समोर येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेत अटक केली आहे.

## दोन गोदामांना आग लागल्याच्या घटना

■ **ठाणे :** शिळफाटा मुंब्रा-पनवेल रस्त्यावर खान कंपाऊंड येथील दोस्ती बिल्डिंग समोर मे. सुभानी फर्निचर हे गुलाम गौस यांच्या ४५०० स्क्वेअर फूट या फर्निचरच्या गोदामात व बाजूच्या मे. नॅशनल बुटिक उमर बाबू मिया शेख यांच्या मालकीच्या पण सोहेल अहमद भाडेकरु असलेल्या १२०० स्क्वेअर फूट या चिंधीच्या गोदामात



आग लागल्याची घटना शनिवारी दुपारी ३ च्या सुमारास घडली.

या घटनेची माहिती प्राप्त होताच घटनास्थळी टोरंट पॉवर कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले. दोन्ही गोदामामधील साहित्य तसेच मोबाईल टॉवरच्या इलेक्ट्रिक केबल जळून नुकसान झाले. आग अग्निशमन दलाच्या जवानांकडून, तसेच आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांकडून पूर्ण विझवण्यात आली. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही.

## महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार



■ **बदलापूर:** राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून बदलापुरात १५० महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. ठाणे जिल्हा नियोजन समिती व राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत हे शिलाई मशीन वाटप करण्यात आले आहे.

अनंत भवन येथे आयोजित कार्यक्रमात शिलाई मशीन वाटप करण्यात आले. समाजात अनेक गरजू व विधवा महिला भगिनींना सन्मानाने जगण्यासाठी आधार मिळावा उदरनिर्वाहाचे साधन मिळावे यासाठी राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसच्या ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष प्रियांका आशिष दामले यांनी पुढाकार घेतला होता. तर कॅप्टन आशिष दामले यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटून गरजू, विधवा महिलांना शिलाई यंत्र व शिलाईचे प्रशिक्षण देण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून समाज कल्याण विभागाच्या साहाय्याने हा उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती दामले यांनी दिली. १५० गरजू व विधवा महिला भगिनींना हे शिलाई यंत्र मिळाल्याने त्यांना जगण्याची नवी उमेद मिळाली असल्याचे सांगून यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानाचे भाव आमच्यासाठी लाखमोलाचे आहेत, अशी भावना आशिष दामले यांनी व्यक्त केली.